अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा


SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १२.०९.२०२५ | अंक नं. १३८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

किमान 20% किंवा
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना..
तेवढी टक्के मजुरीत सूट..*
उत्सव मजुरीचा
ऑफर 27 ऑगस्ट ते 21 सप्टेंबर 2025 पर्यंत वैध
योजनेचा नियम : सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू.
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

# अहिल्यानगर जिल्हा परिषद अध्यक्षपद 'अनुसुचित जमाती महिलेसाठी' राखीव

## राज्यातील ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर; लवकरच निवडणुका होणार



मुंबई – महाराष्ट्रातील ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद अनुसुचित जमाती महिलेसाठी आरक्षित असणार आहे. तर राज्यातील नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, रायगड, बुलढाणा, यवतमाळ, जळगाव या ८ जिल्हा परिषदांचे अध्यक्षपद सर्वसाधारण गटासाठी जाहीर करण्यात आले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेमुळे रखडलेल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका गेल्या ३ वर्षांपासून रखडलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या याचिकांवरील सुनावणीदरम्यान मध्यंतरी सदरच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत घेण्यात याव्यात, असे आदेश निवडणूक आयोगाला दिल्यानंतर निवडणूक आयोगाने या निवडणुका घेण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. मागील महिन्यात गट, गणांच्या अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आलेल्या आहेत. त्यांची आरक्षण सोडत अद्याप निघालेली नाही. या निवडणुका लवकरच होणार असल्याने १२ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष पदांच्या आरक्षणाची सोडत जाहीर करण्यात आली आहे.

यामध्ये नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, रायगड, बुलढाणा, यवतमाळ, जळगाव – सर्वसाधारण गटासाठी. ठाणे, सांगली, कोल्हापूर, धाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली– सर्वसाधारण महिला. पालघर, नंदूरबार – अनुसुचित जमाती. अहिल्यानगर, अकोला, वाशिम – अनुसुचित जमाती महिला. सोलापूर, हिंगोली, नागपूर, भंडारा, – नागरिकांचा मागास प्रवर्ग. धुळे, रत्नागिरी, सातारा, जालना, नांदेड – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला). वर्धा, परभणी – अनुसुचित जाती. बीड, चंद्रपूर – अनुसुचित जाती महिला असे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

त्याचबरोबर पंचायत समित्यांच्या सभापतीपदाच्या आरक्षणाबाबत संख्या ठरवून दिलेली आहे. त्यानुसार नगर जिल्ह्यात सर्वसाधारणसाठी ३, सर्वसाधारण महिला ३, नागरिकांचा मागास प्रवर्ग २, ना.मा.प्र महिला २, अनुसूचित जमाती महिला १, अनुसूचित जाती सर्वसाधारण १ व अनुसूचित जाती महिला १ असे आरक्षण काढण्यात येणार आहे.

# नगरच्या छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात चोरी

## कुलुपे तोडून २ लाख ४२ हजारांची रोकड चोरट्यांनी पळविली

नगर – नगर – कल्याण महामार्गावर नेप्ती (ता.नगर) शिवारात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी कॉलेजच्या विविध विभागांच्या दरवाजांची कुलुपे तोडून मोठ्या प्रमाणावर उचकापाचक करत लेखा विभागातील कपाटातून २ लाख ४२ हजार १३० रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. कॉलेजच्या सीसीटीव्ही मध्ये २ चोरटे कैद झाले असून पोलिसांनी या चोरट्यांचा तपास सुरु केला आहे.

याबाबत कॉलेजचे डॉ. यशवंत रामचंद्र खर्डे (वय ५५, रा. कोल्हार, ता.राहाता) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात ११ सप्टेंबर रोजी फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार २ अनोळखी चोरट्यांनी ७ सप्टेंबर रोजी ९.३० च्या सुमारास कॉलेजचे मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कॉलेजच्या विविध विभागांचे दरवाजे तोडून नुकसान केले. सर्वत्र उचकापाचक केली. कॉलेज मधील लेखा विभागात विद्यार्थ्यांच्या फी चे जमा झालेले २ लाख ४२ हजार १३० रुपये कपाटात ठेवण्यात आलेले होते.

त्या कपाटाचे कुलूप तोडत चोरट्यांनी ही रक्कम घेवून पोबारा केला. ही घटना दुसऱ्या दिवशी उघडकीस आल्यावर कॉलेजच्या व्यवस्थापनाने सर्व विभागांची चौकशी करत कोणत्या विभागातून काय चोरीला गेले याचा आढावा घेतला. त्याचा अहवाल जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था प्रशासनाला दिला. त्यानंतर प्रशासनाच्या सूचनेनुसार नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३३१ (४), ३०५, ३२४ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक एकनाथ आव्हाड हे करत आहेत.

# अहमदनगर रेल्वे स्थानकाचे आता अहिल्यानगर रेल्वेस्थानक नामांतर

## केंद्र सरकारच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'नंतर गृहमंत्रालयाची अधिसूचना जारी

नगर – राज्य सरकारच्या गृह मंत्रालयाने अहमदनगर रेल्वे स्थानकाचे नाव बदलून ते आता अहिल्यानगर रेल्वे स्थानक केल्याचा आदेश ११ सप्टेंबर रोजी काढण्यात आला आहे. या संदर्भात गृहमंत्रालयाचे सहसचिव राजेश होळकर यांनी ही अधिसूचना जारी केली आहे. केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने या संदर्भात ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर राज्य सरकारच्या गृह मंत्रालयाने ही अधिसूचना जारी केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी (ता. जामखेड) येथे आहे. अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त ३१ मे २०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौंडी येथील कार्यक्रमात अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याची घोषणा केली होती.

तत्कालीन आमदार राम शिंदे, आमदार गोपीचंद पडळकर यांनी नामांतराची मागणी केली होती. तत्कालीन विधिमंडळाच्या अधिवेशनात तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी अधिवेशनात नामांतराची मागणी मान्य करत अहमदनगर महापालिकेकडे नामांतराचा ठराव करण्याची सूचना पाठवली होती. प्रशासक राजवट सुरू झाल्यानंतर प्रशासकीय महासभेत नामांतराचा ठराव करण्यात आला. त्यानंतर महसूल व वन विभागाने अहमदनगर शहर, उपविभाग व जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर केल्याची अधिसूचना ८ ऑक्टोबर २०२४ रोजी जारी केली होती.

राज्य सरकारने नाव बदलले असले तरी केंद्र सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या विविध विभागांची नावे मात्र त्यानंतरही अहमदनगरच राहिलेले आहे. आता केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने २ सप्टेंबर २०२५ रोजी अहमदनगर रेल्वेस्थानकाचे नामांतर अहिल्यानगर रेल्वे स्थानक करण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे त्यानंतर राज्य सरकारच्या गृह मंत्रालयाने रेल्वेस्थानकाचे नामांतर केल्याची अधिसूचना जारी केली आहे.

# पोलीस स्टेशनच्या आवारात पेटवून घेतलेल्या महिलेचा मृत्यू

## पुण्याच्या ससून रुग्णालयात सुरु होते उपचार

नगर – पोलीस स्टेशनच्या आवारात एका महिलेने अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना सुपा (ता.पारनेर) पोलिस स्टेशनच्या आवारात २ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ ते ७.१५ वाजण्याच्या सुमारास घडली होती. स्वाती प्रकाश दरेकर (वय ३५,मूळ रा. दरेकर वस्ती, न्हावरा, ता. शिरूर जि. पुणे, हल्ली रा. सुपा, ता.पारनेर) असे या महिलेचे नाव असून पुण्याच्या ससून रुग्णालयात उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सदर महिलेची मुलगी ही सुमारे दीड महिन्यापूर्वी एका मुलासोबत पळून गेल्याने सुपा पोलीस स्टेशन येथे बीएनएस १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर सदर मुलगी आळंदी येथे मिळून आली. सदर मुलीला अहिल्यानगर येथील वन स्टॉप सेंटर येथे ठेवण्यात आले होते. तसेच सुपा पोलीस स्टेशन येथे सदर मुलीने दिलेल्या जबाबामध्ये तिच्या आईचा मित्र हा देखील तिची छेड काढत असल्याचे नमूद केले होते. त्यामुळे सदर मुलगी तिच्या आईकडे जाण्यास तयार नव्हती.

त्यामुळे सदर महिलेने २ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ ते ७.१५ वाजण्याच्या सुमारास सुपा पोलीस स्टेशनच्या आवारात स्वतःच्या अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून घेत आत्म हत्या करण्याचा प्रयत्न केला.यात ती मोठ्या प्रमाणात भाजून जखमी झाली होती. तिला तातडीने उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र तिची प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारासाठी पुण्याच्या ससून रुग्णालयात हलविण्यात आले होते. तेथे उपचार सुरु असताना ७ सप्टेंबर रोजी सकाळी तिचा मृत्यू झाला आहे. याबाबतचा अहवाल बंडगार्डन पोलिस ठाण्यातून ११ सप्टेंबर रोजी सुपा पोलिसांना प्राप्त झाल्याने या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..
रत्नकमल चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367
प्रोप्रा : आशिष चंद्रकांत मुथ्था (वांबोरीकर)

# नगर शहरात चोरटे मोकाट, महिलेला फसवून दागिने पळविले; पुढे खून झाल्याचा केला बनाव

नगर – सकाळी मॉर्निंग वॉकला गेलेल्या महिलेला मोटारसायकल वर आलेल्या दोघा अनोळखी इसमांनी रस्त्यात थांबविले, पुढे खुन झालेला आहे, तुम्ही अंगावर दागिने ठेवू नका, पिशवीत काढून ठेवा अशी बतावणी करत दागिने पिशवीत ठेवायला लावले आणि ती पिशवी घेवून मोटारसायकल वर भरधाव वेगात पोबारा केल्याची घटना सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवर ११ सप्टेंबर रोजी सकाळी घडली.

याबाबत रजनी अशोक कुद्रे (वय ७३, रा. पंकज कॉलनी, समतानगर) या महिलेने तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या नेहमीप्रमाणे ११ सप्टेंबर रोजी सकाळी मॉर्निंग वॉकला गेल्या होत्या. त्या रस्त्याने जात असताना गुलमोहर रोडवरील स्वामी समर्थ मंदिराजवळ आल्यावर त्यांच्या जवळ एका मोटारसायकल वर दोन इसम आले. त्यातील एकाने खाली उतरून त्यांच्या जवळ जात त्यांना पुढे खुन झाला आहे, अशी बतावणी केली. पोलिस आलेले आहेत त्यामुळे तुमच्या गळ्यातील सर्व दागिने पिशवीत काढून ठेवा असे त्यांना सांगितले.

या बतावणीने गोंधळून गेलेल्या फिर्यादी यांनी त्यांच्या गळ्यातील व कानातील सुमारे १ लाख २६ हजार ३१५ रुपये किंमतीचे दागिने त्या इसमाच्या हातातील पिशवीत काढून ठेवले. त्यानंतर त्या इसमाने लगेच मोटारसायकल वर बसत दोघेही इसम भरधाव वेगात तेथून पसार झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्या महिलेने तात्काळ घरी जावून कुटुंबियांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरून दोघा चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३१६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे नागापूर येथील लोकांना कळविण्यात येते की, मौजे नागापूर येथील मिळकत गट/सर्व्हे नं.१४ (जुना गट/सर्व्हे नं.१४४) चे एकुण क्षेत्र ६ हे ६८ आर ही मिळकत नागापूर मस्जिद ट्रस्ट यांच्या मालकीची असून सदर मिळकत आमचे अशिल कै. काकासाहेब म्हस्के मेमोरिअल मेडीकल फाऊंडेशन यांना ९९ वर्षाच्या कराराद्वारे रजिस्टर भाडेपट्टयाद्वारे दिलेली आहे. सदर जागेसंदर्भात उच्च न्यायालयात सेकंड अपील नं ८७९/२०१८ चे प्रलंबित असून मा. उच्च न्यायालयाने आहे ती परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश पारित केलेला आहे. अशाप्रकारची परिस्थिती असताना सदर वाद मिळकतीबाबत नागापूर मस्जिद ट्रस्ट यांचे करिता माहितगार अथवा त्यांच्या करिता इतर हे मिळकत खरेदी, विक्री व अन्य हस्तांतरणाबाबत बोलणी करत आहे व तशी खात्रीशीर माहिती आमच्या अशिलास प्राप्त झालेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी, विक्री, साठेखत, गहाण, दान, नोटरी, बक्षीस अथवा अन्य प्रकारे हस्तांतरणाचा तोंडी अथवा कोणत्याही प्रकारचा लेखी व्यवहार करु नये. सदरचा व्यवहार केल्यास संबंधीतांना मालकी हक्क व कब्जा मिळणार नाही. विनाकारण कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

तारीख : १२/०९/२०२५
अहिल्यानगर.
ॲड. सौरभ सुभाष काकडे
३८७६, काकडे सदन, नांगरे गल्ली, अहमदनगर, फोन नं. ९४२२३३३३३९

ॲड.गौरव अशोक भोसले
बीएसएल, डीटीएल, एलएलबी, एलएलएम, रजि.नं.एमएच/३२६४/२०१७
१ ला मजला, नवीन जिल्हा कोर्ट बिल्डींग, अहिल्यानगर, मो : ८००७९५२०८७

# तोतया लष्करी अधिकारी महिलेला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## घरात सापडले बोगस ओळखपत्र, लष्करी गणवेश, बनावट रायफल आणि पिस्तूल



छत्रपती संभाजीनगर – मागील २४ वर्षांपासून भारतीय सैन्य दलात कॅप्टन असल्याचे सांगत पंचक्रोशीत वावरणाऱ्या आणि विविध संस्था–संघटनांकडून 'महिला लष्करी अधिकारी' म्हणून सन्मान मिळविलेल्या एका तोतया कॅप्टन महिलेला ११ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दौलताबादजवळच्या धरमपूर येथे पोलिसांनी बेड्या ठोकल्या. लष्कराच्या गुप्तचर खात्याला मिळालेल्या माहितीनंतर ही कारवाई करण्यात आली.

रुचिका अजित जैन (वय ४८) असे या महिलेचे नाव असून, धरमपूर येथे गावाजवळच ती एका आलिशान घरात राहत असे. तेथेच पद्मावती देवीचे मंदिर बांधून तिने आश्रमही सुरू केला होता. एकाचवेळी ती लष्करातील कॅप्टन आणि हात पाहून भविष्य सांगणारी 'रुचिका माँ' म्हणून वावरायची.

एक महिला लष्करात कॅप्टन असल्याचे भासवत लष्करी गणवेशात पंचक्रोशीत वावरत असल्याची माहिती लष्कराच्या गुप्तचर खात्याला तीन महिन्यांपूर्वी मिळाली. तिचे छायाचित्रही हाती लागले. त्यांच्या प्राथमिक तपासात रुचिका ही बोगस लष्करी अधिकारी असल्याचे समोर आले. त्यानंतर रुचिका जैनवर बारकाईने नजर ठेवण्यात आली. ११ सप्टेंबर रोजी लष्करी गुप्तचर खाते आणि दौलतबाद पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत तिच्या कृत्याचा पर्दाफाश केला.

रुचिकाच्या आश्रमसदृश आलिशान घरात 'कॅप्टन' अशी नोंद असलेले ओळखपत्र, एक रायफल, एक पिस्तूल, लष्कराचा कॉम्बॅट युनिफॉर्म, दंडावर लावायचा स्पेशल फोर्स लिहिलेला बॅज, कॅप्टन रँकचे तीन स्टार, कॉम्बॅट शूज, कॉम्बॅट टोपी, कमरेचे लष्करी पट्टे, रुचिका जैन लिहिलेली नेमप्लेट, लष्करी गणवेशातील फोटो आणि श्रीरामपूर तसेच छत्रपती संभाजीनगर, परिसरातील विविध संस्था, संघटनांच्या वतीने तिला देण्यात आलेली प्रमाणपत्रे, सन्मानचिन्हे आणि युद्धातील छायाचित्रे हस्तगत करण्यात आली. दौलताबाद पोलिसांनी तिला अटक केली असून, तिची कसून चौकशी करण्यात येत आहे. जेव्हा लष्करी गुप्तचर आणि पोलिस रुचिकाच्या घरी धडकले, तेव्हा तिने आकांडतांडव सुरू केले. 'मला पंतप्रधान कार्यालयाने स्पेशल नियुक्ती दिली आहे. माझ्यावर कसली कारवाई करता? कारवाई करायची असेल, तर तिकडे सीमेवर जा', असे ती या पथकाला म्हणाली. तिला ताब्यात घेऊन तिची चौकशी सुरू करण्यात आली. त्यात ती प्रत्यक्ष दहावी पास असल्याचेही समोर आले.

शाळेमध्ये
CCTV लावणे मजबुरी नाही
तर गरज आहे
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
98222 94622
94220 87757
Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## सिव्हील हडको परिसराची प्रभाग रचना चुकीची; नागरिकांनी नोंदवली हरकत

### प्रभाग ३ मध्ये समाविष्ट करण्याची काका शेळके यांची मागणी



नगर – महापालिकेने ३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा अधिसूचनेत सिव्हील हडको परिसरातील काही भाग प्रभाग क्रमांक ६ मध्ये समाविष्ट करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात नागरिक व चंद्रकांत (काका) शेळके यांनी महापालिका आयुक्तांकडे औपचारिक हरकत नोंदवली आहे.

शेळके यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, सिव्हील हडको परिसर पूर्वी एकाच प्रभागात (प्रभाग ३) होता. मात्र, यावेळी प्रभाग रचनेतून काही भाग प्रभाग ६ मध्ये हलविण्यात आला असून त्यामुळे मतदार यादीतील तुकडे झाले आहेत. डी.पी. रोड, झोपडी कॅन्टीन ते टी.व्ही. सेंटर रोड या नैसर्गिक मर्यादेनुसार प्रभाग निश्चित करणे आवश्यक असताना प्रभाग रचना वाकडी–तिकडी पद्धतीने करण्यात आली आहे, ज्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९५९ चा भंग झाला आहे, असे शेळके यांनी निदर्शनास आणून दिले.

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, सिव्हील हडको भागात ८०० घरे असून त्यातील अर्धी घरे प्रभाग ३ व अर्धी प्रभाग ६ मध्ये विभागली गेली आहेत. एका वसाहतीतील घरांचे असे दोन प्रभागात विभाजन करणे अन्यायकारक आहे. आमचा संपूर्ण परिसर – सिव्हील हडको, गायकवाड मळा, भगत मळा, लोकमत भवन, रासने कॉलनी – एकत्र ठेवून प्रभाग ३ मध्ये समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

याशिवाय शेळके यांनी अधोरेखित केले की, नगरविकास विभागाच्या १० जून २०२५ च्या आदेशानुसार प्रभागांच्या सीमा मोठे रस्ते, नाले, डोंगर इत्यादी नैसर्गिक मर्यादा लक्षात घेऊन आखाव्यात आणि कोणत्याही परिस्थितीत एका वसाहतीतील घरे वा इमारती दोन प्रभागात विभागली जाऊ नयेत. मात्र, या तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचे त्यांनी म्हटले.

तसेच, प्रभाग आरक्षणाबाबतही यावेळी महापालिकेच्या अधिसूचनेत कोणताही उल्लेख नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे शेळके यांनी निदर्शनास आणून दिले. २०१८ च्या निवडणुकीत तत्कालीन आयुक्तांनी प्रभागनिहाय आरक्षण स्पष्ट करून अधिसूचना प्रसिद्ध केली होती. मात्र, यावेळी आरक्षणाची माहिती गाळण्यात आली असून हा नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचा भंग आहे, असा आरोप त्यांनी केला.

शेळके यांनी या अधिसूचनेला बेकायदा ठरवत ती रद्द करावी आणि सन २०१८ प्रमाणे प्रभाग रचना ठेवूनच निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी केली आहे

## विजेचा शॉक बसून एकाचा मृत्यू

नगर – बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी विजेचा शॉक बसून एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना सावेडी उपनगरातील राजपाल वस्त्रदालना शेजारी सुरु असलेल्या एका बांधकाम साईट वर ११ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता घडली. सुनिल कुमार (पूर्ण नाव माहित नाही, वय ३९, रा. गांधीनगर, बोल्हेगाव) असे मयत कामगाराचे नाव आहे. सुनिल कुमार यास विजेचा शॉक बसून तो बेशुद्ध पडल्याने इतर कामगारांनी त्यास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. निलेश कोल्हे यांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून तोफखाना पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## भाऊसाहेब कोल्हे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – निशा लॉन मागील चौधरी मळा येथील रहिवासी भाऊसाहेब बाबूराव कोल्हे (वय ६२) यांचे १२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले, १ मुलगी, भाऊ, भावजय, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते केडगाव येथील तुळजाभवानी ट्रान्सपोर्टचे संचालक होते.

## पोपट कोतकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – केडगाव लोंढे मळ्यातील रहिवासी पोपट मोहन कोतकर (वय ४२) यांचे १२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, भावजय, ३ बहिणी असा परिवार आहे. मोहन कोतकर यांचे ते चिरंजीव तर रणजीत कोतकर यांचे वडील होत.

## हाजी शेख इस्माईल यांचे अल्प आजाराने निधन



नगर – मुकुंदनगर येथील रहिवासी हाजी शेख इस्माईल गुलाम मुस्तफा जरीवाले उर्फ बाबासाहब (वय ७०) यांचे १२ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर हसनशाह कादरी कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आले. त्यांच्यामागे २ मुले, १ मुलगी, २ भाऊ, भावजया, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शहबाज व इम्रान यांचे ते वडील तर अ‍ॅड. हमीदभाई व सलीम जरीवाला यांचे मोठे बंधू होत. त्यांनी इंडियन आर्मीमध्ये २६ वर्षे काम केले.


## उत्तमराव बारगळ पाटील यांचे अल्प आजाराने निधन



नगर – निमगाव खलु सोसायटीचे माजी चेअरमन उत्तमराव (भाऊ) नामदेव बारगळ पाटील (वय ७०) यांचे १२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर निमगाव खलु येथे भिमा तिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ भाऊ, भावजया, २ बहिणी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## कांतीलाल बाफना यांचे वृद्धापकाळाने निधन



शिरुर – शिरुर घोडनदी येथील कांतीलाल झुंबरलाल बाफना (वय ८७) यांचे ११ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर शिरुर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.


त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संजय व सुनील बाफना तसेच मनिषा बोरा यांचे ते वडील होत.

## चंद्रभागा अंत्रे यांचे वृद्धापकाळाने निधन



राहुरी – राहुरी तालुक्यातील सोनगाव येथील चंद्रभागा दगडु अंत्रे (वय ९६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई, पतवंडे असा परिवार आहे. त्या पाराजी अंत्रे व प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे सेवा निवृत्त कर्मचारी प्रभाकर अंत्रे यांच्या मातोश्री तसेच सोनगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच किरण अंत्रे यांच्या आजी होत.

## सुभाष पटाट यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – मेनरोड येथील फुलांचे व्यावसायिक सुभाष काशिनाथ पटाट (वय ६८) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत पटाट यांचे धाकटे बंधू, मंगेश (बंटी) व मयूर (अजिंक्य) पटाट यांचे वडील होत.

## ईशान बाफना यांचे हृदयविकाराने निधन



नाशिक – येथील ईशान किरण बाफना (वय ३७) यांचे ७ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नाशिक येथील द्वारका स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी, २ मुली, आई, वडील असा परिवार आहे. अहिल्यानगर येथील बांधकाम व्यावसायिक आदर्श बिल्डर्सचे प्रकाश जैन यांचे ते जावई होत.



नवनागापूरच्या मंदीरात चोरी करणाऱ्या आरोपींना पकडल्यानंतर जप्त केलेल्या मुद्देमालासह एमआयडीसी पोलिसांचे पथक.

## नवनागापूरच्या मंदिरात चोरी करणाऱ्या तिघा जणांना पकडले

### आरोपींमध्ये दोन अल्पवयीन मुलांचा समावेश; ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर – एमआयडीसी परिसरातील गजानन कॉलनी, नवनागापुर येथील श्री स्वामी समर्थ मंदीरामध्ये झालेल्या चोरीचा अखेर उलगडा झाला असून एमआयडीसी पोलिसांनी एका आरोपीला अटक करत त्याच्या दोन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरीस गेलेली दानपेटी, मोबाईल फोन व रोख रक्कम असा मिळून ७७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

याबाबत २५ जुलै रोजी सुरेश मगन निकम (वय ५०, रा. नंदनवन नगर, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २४ जुलैच्या रात्री ९ वाजता ते २५ जुलैच्या सकाळी ७ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने श्री. स्वामी समर्थ सेवा केंद्र, नवनागापुर येथील मंदीरातील दानपेटी चोरून नेली होती. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांना आरोपींची गोपनीय माहिती मिळाली.

त्यानुसार संशयित दुर्गाबहादुर खिमप्रसाद थापा (वय २३, रा. हॉटेल सह्याद्री, गजानन कॉलनी, अहिल्यानगर) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने दोन अल्पवयीन मुलांच्या मदतीने ही चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांनाही ताब्यात घेतले असून त्यांच्या चौकशीत चोरीस गेलेली दानपेटी व रोख रक्कम जप्त करण्यात आली. तसेच एका अल्पवयीन मुलाने घरातून चोरीचे ५ मोबाईल फोन काढून दिले. ते जप्त करण्यात आले आहेत.

ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मनोज मोंढे, अंमलदार राकेश खेडकर, राजु सुद्रीक, संदीप पवार, सचिन आडबल, किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, ज्ञानेश्वर आघाव, राहुल गुंड्डू यांचा पथकाने केली आहे.

## जिल्हा परिषदेत शिक्षक बदल्यातील गैरप्रकारांबाबत दोषींवर तात्काळ करा अन्यथा 'आंदोलन' करणार

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना निवेदन



जिल्हा परिषदेत शिक्षक बदल्यातील गैरप्रकारांबाबत दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन सामाजिक न्याय विभागाच्यावतीने जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना देण्यात आले.

नगर – जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील शिक्षक बदल्यांमध्ये झालेल्या गैरप्रकारांबाबत दोषींवर तात्काळ निलंबन करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे तालुका अध्यक्ष (सामाजिक न्याय विभाग) चंद्रशेखर रावसाहेब पंचमुख यांनी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांना निवेदन दिले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील अनेक शिक्षकांच्या बदल्यांमध्ये गैरव्यवहार, खोटे कागदपत्रांचा वापर, खोटी माहिती सादर करणे, भ्रष्टाचार व नियमबाह्य पद्धतीने झालेले निर्णय यामध्ये अनेक शिक्षक अधिकारी दोषी आहेत. यामुळे संबंधित सर्व जबाबदारांवर तातडीने कारवाई करून त्यांना शिक्षा व्हावी. तसेच तपासणी समितीमध्ये दोषींना वाचवण्याचा प्रयत्न केला जात असून अनेक निष्पाप शिक्षकांवर अन्याय केला जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे. त्यामुळे बदल्यांमधील सर्व दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तातडीने सेवेतून दूर करावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. यावेळी शेखर पंचमुख यांनी इशारा दिला की, दोषींवर कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल.

## 'पन्नास टक्के व्याज माफ सवलत' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

नगर – महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपुर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एक रक्कमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यास थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्यातबाबतची एक रकमी परतावा योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे. महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीनी सदर योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक बी.एस. भोसले यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यालयाशी ०२४१–२४५००३० या क्रमांकावर संपर्क साधावा,असेही कळविण्यात आले आहे.

## स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे 'आंतर विद्यालय हिंदी निबंध स्पर्धा'

नगर – स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे सदाशिव दत्तात्रय शुक्रे स्मृतिप्रीत्यर्थ अंतर विद्यालय हिंदी निबंध स्पर्धा यंदा द्वितीय वर्षी आयोजित करण्यात आली आहे. इच्छुक विद्यालयांनी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १८ सप्टेंबरपर्यंत विद्यार्थ्यांनी स्वाहस्ताक्षरांत लिहिलेले निबंध स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल येथे जमा करावेत.

या स्पर्धेसाठी इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचा वरदान – ई–लायब्ररी व डिजिटल पुस्तके हा विषय देण्यात आला असून शब्दमर्यादा २०० शब्दांची आहे. तर इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण प्रणाली व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हा विषय देण्यात आला असून शब्दमर्यादा ३०० शब्दांची आहे.

स्पर्धेसाठी निबंध विद्यार्थ्यांनी स्वतः च्या शाळेतच लिहिणे आवश्यक असून प्रत्येक गटातून तीन निवडक निबंध आयोजकांकडे पाठवणे बंधनकारक आहे. स्वलिखित निबंध ई–मेलद्वारे (edusnehalaya.org) अथवा प्रत्यक्ष आयोजकांकडे जमा करता येणार आहेत. निबंध पाठविण्याची अंतिम मुदत १८ सप्टेंबर २०२५ आहे.

प्राप्त निबंधांमधून प्रत्येक गटातील चार क्रमांक आयोजकांकडून जाहीर करण्यात येतील. विजेत्यांना आकर्षक पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात येणार असून सर्व सहभागी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र दिले जाणार आहे. पहिला क्रमांक – १००० रू., दुसरा क्रमांक – ७५० रू., तिसरा क्रमांक – ५०० रू. तर उत्तेजनार्थ पारितोषिक – ३०० रू. रुपये व प्रमाणपत्र असे स्वरूप असेल.

या स्पर्धेतील पारितोषिक वितरण समारंभ २७ सप्टेंबर रोजी पार पडणार असून त्यासंबंधी सविस्तर कार्यक्रम वेळापत्रक २५ सप्टेंबर रोजी व्हॉट्सअ‍ॅपद्वारे कळविण्यात येईल.

अधिक माहितीसाठी ९९२१८१०१७९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ब्ल्यू डायमंड अ‍ॅकॅडमीचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

### श्रवण शिंदे यास परीक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त



नगर – शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षात ब्लू डायमंड अकॅडमी स्कूलचे इ.८ वी मधील १३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत प्रविष्ट झाले होते, त्यातील ४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले व इयत्ता ५वी मधील २६ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत प्रविष्ट झाले होते, त्यातील ९ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले. सर्व पात्र विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळाले आहेत. इ. ५ वी तील चि. श्रवण सुनील शिंदे यास परीक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त झाली. त्याचा स्कूलचे प्राचार्य व उपप्राचार्या यांनी सन्मान केला. विद्यार्थ्यांचे प्राचार्य, उपप्राचार्या, शिक्षक, शिक्षिका तसेच पालकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून अहिल्यानगर शहरात १४ सप्टेंबर रोजी होणार 'स्वच्छ रॅली'



नगर – अहिल्यानगर मध्ये स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून विविध सामाजिक संस्था, संघटनांच्या पुढाकारातून 'स्वच्छ रॅलीचे' आयोजन करण्यात आलेले आहे. नगरकरांनी या रॅलीत सहभाग द्यावा असे आवाहन आयोजक रोटरी प्रियदर्शनीच्या सौ. प्रतिभा धुत, हरियालीचे सुरेश खामकर, दादासाहेब करंजुले, स्वच्छता रक्षक समितीच्या आश्लेषा भंडारकर, अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनचे चंद्रशेखर मुळे, नितीन पाठक, नैतिक फाउंडेशनचे प्रशांत दरेकर, रोटरीचे राजेश परदेशी यांनी केले आहे.

या रॅलीत रोटरीचे सर्व क्लब, शासकीय तंत्रनिकेतन, वैद्यकीय संघटना निमा, दंत वैद्यकीय संघटना, फिटनेस वर्ल्ड, सावली दिव्यांग संस्था आदीं सहभागी होणार आहेत.

रॅली १४ सप्टेंबर रोजी सकाळी ७:३० वा. सावेडी जॉगिंग ट्रॅक, प्रोफेसर कॉलनी, येथून निघणार असून सावेडी परिसरातील गुलमोहर रोड, पारिजात चौक, गुलमोहर पोलीस चौकी, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, भिस्तबाग चौक, कुष्ठधाम रोड, प्रोफेसर चौक येथून पुन्हा जॉगिंग ट्रॅक या ठिकाणी येणार असून येथे समारोप होणार आहे.

रॅलीमध्ये सायकलसह वाहन कींवा पायी सुध्दा सहभागी होता येईल. रॅली संपल्यानंतर जॉगिंग पार्क परीसरा मध्ये पायी चालत कचरा देखील गोळा करण्यात येणार आहे, अशी माहिती हरियालीचे सुरेश खामकर यांनी सांगितले.

## होमगार्डच्या मदतीने बायपासवर ट्रक चालकांकडून पैशांची वसुली

### 'एमआयडीसी'चा पोलिस कर्मचारी निलंबित, पोलिस अधीक्षकांचे आदेश

नगर – शेंडी बायपास परिसरात ट्रक चालकांकडून अवैधरीत्या पैसे गोळा करणार्या प्रकाराचा पर्दाफाश झाला आहे. या गंभीर प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार विकास दळवी यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत.

याबाबत ची माहिती अशी की, ९ सप्टेंबर रोजी सोशल मिडीयावर एक व्हिडीओ क्लिप व्हायरल झाली. या व्हिडीओमध्ये रात्री उशिरा एका व्यक्तीकडून ट्रक चालकाकडून रोख पैसे घेत असल्याचे स्पष्टपणे दिसत होते. तपासाअंती ही घटना ८ सप्टेंबर रोजी रात्री १० ते ११ वाजेदरम्यान घडल्याचे निष्पन्न झाले. प्राथमिक चौकशीदरम्यान संबंधित व्यक्ती हा होमगार्ड बाळू जाधव असल्याचे समोर आले. त्याचा जबाब नोंदवला असता, त्याने मान्य केले की, हे पैसे त्याने पोलीस अंमलदार विकास दळवी यांच्या सांगण्यावरून जमा केले होते.

यापूर्वीही अशा प्रकारच्या काही तक्रारी प्राप्त झालेल्या असून, त्याबाबत सोशल मिडीयावरही व्हिडीओ व्हायरल झालेले होते. सदर प्रकरणी चौकशी सुरू आहे. तसेच होमगार्ड बाळू जाधव यांचा कसुरी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी गृह रक्षक दलाचे समादेशक तसेच अपर पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

## डॉ. नितीन साळवे सेट परीक्षा उत्तीर्ण



श्रीरामपूर – रयत शिक्षण संस्थेच्या श्रीरामपूर येथील चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स येथील वाणिज्य विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. नितीन बाळासाहेब साळवे यांनी १५ जून २०२५ रोजी झालेल्या राज्य पात्रता परीक्षा (SET) मध्ये यश संपादन केले आहे.

डॉ. साळवे यांनी यापूर्वी व्यवसाय प्रशासन या विषयात पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी संपादन केली असून शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात ते सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी कोपरगाव, सातारा येथील महाविद्यालयात सेवा केलेली आहे. त्यांचा हा यशस्वी प्रवास संस्थेसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

उन्हाळ्यात सब्जा खाण्याचे अनेक फायदे आहेत. सब्जा बियांमध्ये फायबर, प्रोटीन, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह, फॉस्फरस यांसारखे पोषक घटक असतात. या दिवसांमध्ये सब्जा खाण्याचे किंवा पिण्याचे भरपूर फायदे सांगितले जातात. हे सगळे घटक आरोग्याचे चांगले पोषण होण्यासाठी अतिशय उपयुक्त असतात.

## पाककला

### बासमती शृंगार

**साहित्य** – २ वाट्या बासमती तांदूळ, १ वाटी खवा, ३ मोठे चमचे साजूक तूप, ३ वाट्या साखर, अर्धी वाटी काजू-बदाम काप पाव चमचा बेदाणे, १ चमचा वेलदोडा पूड, पाव चमचा केशर (दुधात भिजवून), १ मोठा चमचा गुलाबपाणी (इसेन्स नव्हे) आणि थोड्या गुलाब पाकळ्या.

**कृती** – तांदूळ स्वच्छ धुवून निथळावे. तांदळाच्या दुप्पट पाणी घेऊन ते उकळून त्यात मोकळा सळसळीत भात शिजवावा आणि परातीत पसरून गार होऊ द्यावा. साखरेचा तीनतारी पाक करून त्यात खवा, केशर, वेलदोडा पूड घालावी. जाड बुडाच्या भांड्यात तूप तापवून काजू-बदाम-बेदाणे परतून त्यावर भात घालावा. साखरेचा पाक, गुलाबपाणी घालून सगळे अलगद मिसळावे. मंद आचेवर तवा ठेवून त्यावर भांडे ठेवावे. घट्ट झाकण ठेवून पाक जिरून वाफ येऊ द्यावी.

## सल्ला

✼ चिंच पाण्यात कुस्करून ते पाणी गाळून त्यात साखर घालून प्यायल्याने उष्माघातात आराम वाटतो.

✼ घसा दुखणे, आतून लाल होणे, त्यामुळे खाण्यापिण्यात त्रास होतो. यासाठी अदरक व हळद दुधात उकळून घ्यावे. चहाप्रमाणे प्यावे.

✼ बऱ्याचदा किचनमध्ये वास येऊ लागतो. यासाठी दोन कप पाण्यात अर्धा कप व्हिनेगर मिसळून उकळून घ्या व वास येत असलेल्या जागी ओता.

## सौंदर्य

चमचाभर मध, चमचाभर ओटामिल, ३-४ थेंब लिंबाचा रस व चमचाभर दूध एकत्र करून पेस्ट बनवा. ती उघडी रोमछिद्रे असलेल्या त्वचेवर लावा. १५ मिनिटांनी धुवा.

## वास्तू

नवविवाहित जोडप्याने एकाच गादीवर झोपल्याने त्यांच्यात दुरावा निर्माण होत नाही. तसेच त्यांच्यातील प्रेमही आटत नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५

**सप्तमी श्राद्ध, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, कृत्तिका १०।११, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आरोप-प्रत्यारोपांपासून दूर रहा. मोठ्यांचा सल्ला घ्या. आरोग्य चांगले राहील. एखाद्या जुन्या मित्राशी भेट होईल. व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल.

**वृषभ** : आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे. इच्छित कार्य पूर्ण होतील. मनावर नियंत्रण ठेवा. मित्रांचा सहयोग मिळेल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.

**मिथुन** : भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होणे शक्य आहे. पैशासंबंधी स्थिती ठीक राहिल. आजचा दिवस जोमदार ठरेल. दिवस संमिश्र जाईल.

**कर्क** : इच्छित विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये वरिष्ठांची सल्ला घेऊन पाउल टाका. शुभ वार्ता देखील मिळतील. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल.

**सिंह** : वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल. कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे.

**कन्या** : धर्मविषयक कामामध्ये पैसा खर्च होईल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात.

**तूळ** : आपणास समाधानकारक स्थिती मिळेल. आर्थिक लाभ मिळेल. आरोग्याला त्रास होऊ शकतो. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील.

**वृश्चिक** : भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक विषयांमध्ये स्थिती चांगली राहील. कुटुंबियांच्या सहवासामुळे दिवस आनंदात जाईल. आरोग्य मध्यम राहील.

**धनु** : स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. संपूर्ण दिवस वातावरण होकारात्मक राहील. खाण्या-पिण्यात काळजी घ्या. दिवस आनंदात जाईल. मागील उधारी वसूल होईल.

**मकर** : मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात. कार्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. दिवस कालच्या इतका सकारात्मक जाणार नाही. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.


**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. हसत खेळत वेळ खर्च होईल. पैसे मिळवण्याचा एखादा मार्ग आपल्या स्वतःच्या घरातून मिळू शकतो.

**मीन** : मित्र मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील. मागील उधारी वसूल होईल. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२६१

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) मडके भाजण्याची कुंभाराची भट्टी ३) अपमान, अवमान, पाणउतारा ५) ठकबाजी ६) तापामुळे तोंडापाशी उठणाऱ्या बारीक पुटकुळ्या, ज्याअर्थी ७) क्वचित एखादे प्रसंगी ११) साधू, संन्याशी १२) विश्वास, भरवसा १७) फायदा, लाभ १८) तप्त, लसलशीत, तापलेले २१) सहा ऋतूंपैकी एक ज्यात झाडांना नवीन पालवी फुटते २२) हाताचा अंगठा व करंगळी यातील जास्तीत जास्त अंतर २३) एक बांबूवर्गीय वनस्पती २४) राख, राखण, राखी २५) वाद्य वाजविल्यानंतर काही काळ त्याचा राहणारा आवाज, शेवट, अखेर

**उभे शब्द :-** १) प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवाजी महाराजांनी याचा कोथळा काढला होता २) दिन, दिवस, दिस ३) मनुष्य, मानव ४) बसक्या नाकाची ८) तापलेल्या दुधावर येणारा पापुद्रा ९) पृथ्वीच्या पृष्ठभागावरची भुकटी, मृत्तिका १०) चिंता, काळजी १३) फरक, अंतर १४) अटीची भाषा १५) माह, महिना १६) शिजलेला तांदूळ १९) दही घुसळून ताक करण्याचे साधन २०) थंड, गार

### शब्दगंध क्र. ७२६० चे उत्तर



### फिल्मीचक्कर क्र. १२०५ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : माणसाच्या अंगी राक्षसासारखी शक्ती असावी; परंतु त्याने तिचा राक्षसी उपयोग करू नये.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मृत्यूनंतर मानवी शरीराचे अवयव कोणत्या क्रमाने बंद पडतात?

असे मानले जाते कि आपल्या मृत्यनंतरही मानवी मेंदू १० मिनिटे कार्यरत राहतो, मात्र हा संशोधनाचा विषय आहे एका तासानंतर मृत्यूच्या क्षणी, शरीरातील सर्व स्नायू विश्रांती घेतात, अशी अवस्था ज्याला प्राथमिक फ्लॅक्सीसिटी ३ म्हणतात. पापण्यांचा तणाव कमी होतो, बाहुली फुटतात, जबडा मुक्त पडतो आणि शरीराचे सांधे व अंग लवचिक असतात. स्नायूंमध्ये तणाव कमी झाल्याने, त्वचेची तीव्रता वाढेल, ज्यामुळे शरीरातील जबडे किंवा कूल्हे यासारखे प्रमुख सांधे आणि हाडे उद्‌भवू शकतात. जसजसे स्नायू विश्रांती घेतात तसतसे स्फिंटर टोन कमी होतो आणि मूत्र व मल निघून जातो.

दोन-तीन तासांनी हृदय थांबण्याच्या काही मिनिटांतच, पॅलॉर मोर्टिस नावाच्या प्रक्रियेमुळे त्वचेच्या लहान नसांमधून रक्त काढून टाकल्यामुळे शरीर फिकट गुलाबी होते. ही प्रक्रिया गडद त्वचेऐवजी हलकी त्वचेवर अधिक दिसू शकते. रक्ताभिसरण प्रणालीद्वारे सुमारे ५.६ लीटर (६ चतुर्थांश) रक्त प्रसारित करते, मानवी हृदय सरासरी मानवी आयुष्यादरम्यान २.५ अब्जांपेक्षा जास्त वेळा धडकते. त्याच वेळी शरीरास त्याच्या आसपासच्या वातावरणीय तपमानापर्यंत पोचल्याशिवाय, शरीराचे सामान्य तापमान 37 from go (.6 .6. F \°) पर्यंत थंड होऊ लागते. अल्गोर मोर्टिस किंवा डेथ चिल म्हणून ओळखले जाणारे, शरीराचे तापमान कमी होण्याने काही प्रमाणात रेषीय प्रगती होते: ताशी १.५ डिग्री.

हृदय यापुढे रक्त पंप करत नाही म्हणून, गुरुत्वाकर्षण शरीराच्या जवळजवळ जमिनीवर (पूलिंग) जवळ खेचण्यास सुरवात करतो, ही प्रक्रिया लिव्हर मोर्टिस आहे. जर शरीर पुरेशी (कित्येक तास) अव्यवस्थित राहिली तर जमिनीच्या जवळच्या शरीराच्या अवयवांना साठलेल्या रक्तापासून लालसर जांभळ्या रंगाचा रंग दिसतो. शवविच्छेदन करणारे कधीकधी याला पोस्टमार्टम डाग म्हणून संबोधतात. मृत्यू नंतर जवळजवळ तिसऱ्या तासात, शरीराच्या पेशींमधील रासायनिक बदलांमुळे सर्व स्नायू ताठर होऊ लागतात, याला कठोरता मोर्टिस म्हणतात. पुढच्या कित्येक तासांत, कठोर बोटांनी चेहरा आणि खाली छाती, ओटीपोट, हात आणि पाय बोटांनी आणि बोटांपर्यंत पोचतील.

विशेष म्हणजे, कठोरपणाच्या मॉर्टिसचा त्यांना लवकर परिणाम झाल्यामुळे डोळे बंद ठेवण्याच्या इच्छेमुळे मृत व्यक्तीच्या पापण्यांवर नाणी ठेवण्याची जुनी प्रथा उद्‌भवली असावी. १२ तास नंतर कडक मोर्टिसमुळे सुमारे १२ तासांनंतर संपूर्ण शरीरात स्नायूंच्या कडकपणा उद्‌भवू शकतो, तथापि याचा परिणाम डिसेस्टेन्टचे वय, शारीरिक स्थिती, लिंग, हवेचे तापमान आणि इतर घटकांमुळे होईल.

### घोडा आणि माणूस

एका अरण्यात एक घोडा राहत होता. एकदा भरपूर चरल्यावर पाणी पिण्यासाठी तो एका तलावाजवळ आला. त्याच तलावात एक माजलेला रान डुक्कर आनंदाने डुबक्या मारीत होता. घोडा पाणी पिऊ लागला असता रानडुक्कराने त्याला प्रतिबंध केला. तो घोड्याला पाणी पिऊ देईना. त्या दोघांचे भांडण जुंपले. दोघे हमरी-तुमरीवर येऊन एकमेकांच्या अंगावर धावून जाऊ लागले.

इतक्यात जवळच्या वाटेने एक माणूस चाललेला घोड्याने पाहिला. त्याच्याजवळ जात घोडा म्हणाला,

''दादा, बघा, ना, रानडुक्कर मला पाणी देत नाही. तहानेने माझा जीव अगदी व्याकूळ झाला आहे. तेव्हा तुम्ही त्या रानडुक्कराला ठार करा; म्हणजे मला पोटभर पाणी पिता येईल.

घोड्याचे म्हणणे त्या माणसाने मान्य केले. तो त्या घोड्यावर बसला आणि तलावाजवळ आला. त्याने रानडुक्कराला ठार मारले. ते पाहून घोड्याला आनंद झाला. तो पोटभर पाणी प्याला आणि माणसाला म्हणाला,

''आता खाली उतर.'' पण तो माणूस खाली तर उतरलाच नाहीच; उलट घोड्यालाच म्हणाला, ''मित्रा, तू माझ्या फारच उपयोगाचा आहेस. आता मी तुला माझ्या घरी नेऊन बांधून ठेवणार. कामासाठी इकडे-तिकडे फिरताना तुझ्या पाठीवर बसून प्रवास करणार.'' माणसाचे हे बोलणे ऐकून घोड्याला फारच पश्चाताप झाला. तो अता कायमचा माणसाचा गुलाम बनला होता.

**तात्पर्य** – क्षुल्लक कामासाठी घोड्याला माणसाची गुलामगिरी पत्करावी लागली.

# जीवन का अमृत (भाग १)



के पास पहुँच गये। वह फ़कीर झाड़-फूँक करता रहा और बीच-बीच में अपने पीर का आह्वान भी करता जाता था । पर उसका पीर नहीं आया । मेरी लड़की के मुँह से निकला कि हम नामलेवाओं के रहते यहाँ कोई पीर कैसे आ सकता है। वह फ़कीर बड़ा हताश सा हो गया। फिर भी हमने उसे जो देना था देकर वहाँ से विदा ली। इस सप्ताह का इतवार का मेरा सत्संग छूट गया था और मैं सत्संग नहीं सुन सका। जब अगली बार आश्रम पहुँचा तो मुझे बताया गया कि पिछले इतवार का सत्संग तो मेरे लिए ही था और विशेष कर मेरे दामाद के लिए।

### गुरू और परमात्मा

मैंने पुनः महाराज जी से दामाद के लिए दया की भीख माँगी। महाराज जी ने बड़ी मौज में आकर फ़रमाया कि इसे दो महीने बाद नामदान मिलेगा। मुझे मेरे एक मित्र ने आश्वस्त किया कि अब कम से कम दो महीने तक तो यह जीवित रहेगा ही। मेरे लिए यह बहुत बड़ी बात थी क्योंकि मेरा दामाद उस समय म रणासन्न अवस्था में था । कुछ समय पश्चात ऑपरेशन की Medical Report भी आ गई और जिस दवाई को पहले ही दिन महाराज जी ने देने के लिए कहा था, वही दवाई अब डॉक्टरों ने भी लिख दी। ख़ैर इलाज हुआ। महाराज जी की बताई हुई गोलियों से ही मेरा दामाद ठीक हो गया। घर की सब खुशियाँ लौट आईं और अब वह लड़का अफ़सर है और बड़े मज़े में है। मेरी इसी लड़की को पिछले ११ साल से कोई संतान नहीं थी मैंने अर्ज़ की तो महाराज जी ने कहा कि अमुक स्त्री को अगर बच्चा हुआ तो तुम्हें भी होगा। 'ख़ुदा की गत ख़ुदा ही जाने ।' उस अमुक स्त्री के यहाँ पुत्र होने के पश्चात मेरी लड़की के यहाँ भी लड़की पैदा हुई और उसके बाद एक और लड़की पैदा हुई यानी निःसंतान को दो-दो संताने महाराज जी ने दीं। बातें तो और भी बहुत हैं। बहुत-सी ऐसी समस्यायें आईं जो महाराज जी ने स्वयं बिना कहे ही हलकर दीं। एक बार महाराज जी का जन्मदिन मनाया जा रहा था । रागी स्टेज पर गुरुवाणी का पाठ कर रहे थे। हम कुछ सेवादार रागियों के (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

हम शरीर नहीं आत्मा है। आत्मा का रूप बिन्दु रूप है। आत्मा बाल की नोक के बराबर है। आत्मा सिर में पीनियल ग्रन्थि के अन्दर रहती है। आत्मा हमारे दिमाग के द्वारा हमारे शरीर को नियंत्रित करती है। शरीर का प्रत्येक अंग दिमाग से जुड़ा है। हमारे जीवन में जो भी घटना घटती है, वह शरीर से दिमाग में जाती है और दिमाग से आत्मा को अनुभव होती है। शरीर की कर्म इन्द्रियां हैं, हाथ, पैर, नाक, कान, मुख, त्वचा, मल द्वार, प्रजनन इन्द्रिय और जीभ । मनुष्य शरीर की ५ ज्ञान इन्द्रियां जो विभिन्न प्रकार का ज्ञान हासिल करती हैं। १. आंखें २. नाक ३. कान ४. जीभ ५. त्वचा तीन सूक्ष्म इन्द्रियां हैं। १. मन रहता है। संकल्प करना, सोचना, जन्म से मृत्यु तथा मन सोचता ही २. बुद्धि – मन में जो भी संकल्प करता है, बुद्धि निर्णय देती है कि यह ठीक है या नही । ३. संस्कार भूतकाल की या पिछले जन्मों की रिकार्डिंग रहती है।

हमारे शरीर में रीढ़ की हड्डी में ऊर्जा चक्र हैं।

### आज्ञा चक्र

प्रत्येक ऊर्जा चक्र का रूप भी आत्मा के सामान बिन्दु रूप है। इन में ५ ऊर्जा केन्द्र शरीर की रीढ़ की हड्डी में स्थित हैं। ये ५ ऊर्जा चक्र है, स्वाधिष्ठान, मणिपुर, हृदय चक्र, कंठी चक्र । ऊर्जा चक्रों में एक चक्र मूलाधार, भृकुटी में पीनियल ग्रन्थि के अन्दर है, जिसे आज्ञा चक्र कहते हैं एक ऊर्जा चक्र जिसे सहस्त्रार चक्र कहते हैं, सिर में सबसे ऊपर, जहां जन्म के समय कोमल हिस्सा है, उस में रहता है।

सभी ऊर्जा चक्र विभिन्न ग्रंथियों के द्वारा दिमाग से होते हुए आत्मा से जुड़े हुए हैं। ये ऊर्जा चक्र जहां हैं, उन के सामने वाले शरीर के आन्तरिक अंगों को प्रभावित करते हैं। शरीर के किसी आन्तरिक या बाहरी हिस्से पर जो कुछ घटता है, उस का प्रभाव ऊर्जा चक्रों पर भी होता है।

जब ये ऊर्जा चक्र असंतुलित हो जाते हैं तो तरह तरह के रोग लग जाते हैं। ये ऊर्जा चक्र और कुछ नहीं आत्मा के अन्दर भरे हुए भागों को प्रकट करते हैं। आत्मा जो मन में सोचती है वह सब इन सूक्ष्म ऊर्जा केन्द्रों के द्वारा शरीर से कर्म के रूप में लाती है। सभी सूचनायें, आत्मा के विभिन्न भागों में अंकित हैं। ये ऊर्जा चक्र आत्मा के विभिन्न भागों में रिकॉर्डेड ज्ञान का विस्तार करते हैं ।

रीढ़ की हड्डी में ३३ मनके होते हैं। इन मनको में सभी ऊर्जा चक्र होते हैं। इन चक्रों का रूप बिन्दु रूप है। यह बिन्दु एक प्रकाश की तरह दिखते हैं। इन ऊर्जा चक्रों से हर समय ऊर्जा निकलती रहती है। यह ऊर्जा प्रकाश के रूप में निकलती है। यह ऊर्जा स्थूल आंखों से दिखाई नहीं देती। ये ऊर्जा प्रत्येक चक्र की सीध में आधा से तीन इंच स्थूल शरीर से बाहर निकलती रहती है। ये ऊर्जा प्रकाश के रूप में चक्र की सीध में शरीर से आगे और पीछे दोनों तरफ प्रवाहित होती

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

कनडक्टर : बाई मुलांचं वय किती?????

बाई : धाकटा २ वर्ष, मधला २.५ वर्ष, थोरला ३ वर्ष...

कनडक्टर : बाई वय भले हि कमी सांगा पण गॅप तरी ९ महिन्यांचा ठेवा......

बाई : मधला जावेचा आहे मुड्द्या...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✼ राष्ट्रीय जल पुरस्कार २०२० प्राप्त सर्वोत्कृष्ट राज्य कोणते?

– उत्तर प्रदेश

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

जर वेदनांचे स्वरूप तीव्र असेल व नेहमीच प्रत्येक पाळीत त्रास होत असेल तर तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन घेणे गरजेचे असते.

**क) कष्टार्तव (Dysmenorrhea) –** याम ध्ये रजःस्राव होताना उदर व कटीभागी अतिशय वेदना होणे, काही स्त्रियांमध्ये योनिभागीदेखील वेदना होणे, पाळीपूर्व अस्वस्थता, मासिक पाळी सुरू होण्याच्या आधी साधारणत: आठ दिवसांपासून ओटीपोटांमध्ये वेदना, मासिक पाळी सुरू होण्याच्या आधी अस्वस्थ वाटणे, नैराश्य वाटणे, मन हळवे होणे, छोट्याशा कारणांवरून रडायला येणे, संपूर्ण अंगामध्ये जडपणा वाटणे, स्तनांमध्ये वेदना होणे ही लक्षणेही जाणवतात. यालाच मासिक पाळी सुरू होण्यापूर्वीची लक्षणे (Premenstrual Symptom) असे म्हणतात. ओटीपोटातील वेदना तीव्र होऊन पाळीची सुरुवात होते. या वेदनांमुळे स्त्री या

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

दिवसांमध्ये दैनंदिन कामे व्यवस्थित करू शकत नाही. तिचे लक्ष सारखे वेदनेकडे जाते. काही स्त्रियांमध्ये या काळात ओटीपोटाबरोबरच संपूर्ण अंग दुखणे, डोके दुखणे, मलावष्टंभाचा (Constipation) त्रास होणे, मळमळ व उलटी होणे ही लक्षणे दर महिन्याला दिसतात. अशा अवस्थेत बऱ्याच मुलींना शाळा, कॉलेज बुडवून घरीच थांबावे लागते; तर काही स्त्रियांना नोकरीच्या ठिकाणी जाता येत नाही. जर वेदनांचे स्वरूप तीव्र असेल व नेहमीच प्रत्येक पाळीत त्रास होत असेल तर तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन घेणे गरजेचे असते. हा व्याधी स्वतंत्र तसेच परतंत्र असू शकतो. मासिक पाळीतील रजःस्राव कधीही संपूर्णपणे वेदनारहित होत नाही. बीजनिर्मितीमुळे पाळीमध्ये वेदना होतात. हा वेदनांचा त्रास प्रत्येक स्त्रीच्या मानसिकतेवर व सहनशीलतेवर अवलंबून असतो. सहसा उच्चभ्रू, सुखवस्तू तसेच बैठे काम करणाऱ्या स्त्रियांमध्ये या व्याधीचे प्रमाण जास्त आढळते. सुरुवातीला साधारणत: काही वर्ष बीजनिर्मिती होत नसल्याने मासिक पाळीमध्ये वेदना होत नाही. परंतु दोन-तीन वर्षांनंतर बीजनिर्मिती सुरु होऊन ओटीपोटात दुखते. सहसा ४०-५०% मुलींना कष्टार्तवाचा त्रास होत असतो. यातील काही मुलींचा लग्नानंतर कष्टार्तवाचा त्रास कमी होतो; तर काहींचा त्रास पहिल्या प्रसूतीनंतर कमी होतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

# निरपेक्ष कर्मसन्यास करत राहतो तोच खरा शिक्षक

**प्राचार्य अनिल सहस्त्रबुद्धे यांचे प्रतिपादन; श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्यावतीने आयोजित शिक्षक दिन गौरव सोहळा**

नगर – उतू नका, मातू नका, घेतला वसा टाकू नका. आपण हाती घेतलेले काम वसा घेतल्यासारखे करत रहा, असे प्रतिपादन पेमराज सारडा कॉलेजचे माजी प्राचार्य अनिल सहस्त्रबुद्धे यांनी केले.



श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत श्री समर्थ विदया प्रसारक मंडळाच्यावतीने आयोजित शिक्षक दिन गौरव सोहळ्याप्रसंगी ज्येष्ठ प्राध्यापक तसेच पेमराज सारडा कॉलेजचे माजी प्राचार्य अनिल सहस्त्रबुद्धे मार्गदशन केले. (छाया – उदय जोशी)

श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला येथे श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्यावतीने आयोजित शिक्षक दिन गौरव सोहळ्याप्रसंगी अनिल सहस्त्रबुद्धे यांनी प्रमुख अतिथीपद भूषविले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला माध्यमिक विभाग मुख्याध्यापिका तथा प्राचार्य श्रीम संगीता जोशी यांनी भूषविले. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्र. स. ओहोळ, संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे सेक्रेटरी तथा प्राथमिक विभाग चेअरमन सुरेश क्षीरसागर, संस्थेचे खजिनदार संजय कुलकर्णी, संस्थेचे सदस्य अ‍ॅड. किशोर देशपांडे, संस्थेचे सदस्य स्वप्नील कुलकर्णी, सुनील जोशी तसेच संस्थेच्या चारही शाळांचे मुख्याध्यापक सौ. वसुधा जोशी, अजय महाजन, सौ. धनश्री गुंफेकर व पर्यवेक्षक सुनील कानडे या सर्वांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा द्विगुणीत झाली.

सहस्त्रबुद्धे म्हणाले संपूर्ण समाज घडविण्याचे दायित्व शिक्षकांच्या शिरावर असते. शिक्षक विद्यार्थ्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडवत असतो. विद्यार्थ्यांच्या मनातील मागासलेपणाचे न्यून खोडून काढून माणुसकीचे स्फुल्लिंग प्रकट करणे हे शिक्षकाचे प्रथम कर्तव्य असावे. म्हणूनच शिक्षक राष्ट्राचा पाईक असतो. श्री समर्थ रामदासांनी शिक्षकांकडे वैश्विक राष्ट्र निर्माण करण्याचे काम सोपिवले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी केले. आपल्या संस्थेतुन शिकून गेलेला विद्यार्थी आज शाळेचे नाव जगभर गाजवत आहेत. आपला समर्थ ब्रँड तयार करणाऱ्या सर्व शिक्षकांचा सन्मान करणे हे या गौरव सोहळ्याचे प्रमुख उद्दीष्ट आहे असे कुलकर्णी यांनी सांगितले.

याप्रसंगी बोलताना कार्यक्रम अध्यक्षा संगीता जोशी यांनी सर्व शिक्षकांना शिक्षकदिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच शिक्षकांनी नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे होऊ घातलेल्या बदलांना सामोरे जाण्यासाठी स्वतःमध्ये बदल घडवून आणा, मार्गदर्शकाची भूमिका घ्या असा संदेश सर्वांना दिला.

संस्थेचे खजिनदार संजय कुलकर्णी यांनी देखील सर्वांना शुभेच्छा देताना शिक्षकी पेशा व ज्ञानदानाचे काम अखंडपणे करत रहा असे विचार मांडले.

सुरेश क्षीरसागर म्हणाले शिक्षक समाज घडविण्याचे काम करत आहेत त्यामुळे त्यांचा सन्मान होणे गरजेचे आहे. आपल्या चारही शाळांचा चढता आलेख हा सर्व शिक्षकांमुळे आहे. आपल्या कार्याची दखल घेण्यासाठी मागील ५ वर्षांपासून हा गौरव समारंभ घेण्यात येतो आहे आणि पुढेही घेतला जाईल.

संस्थचे सदस्य सुनील जोशी यांनी आभार मानताना सर्वांना शुभेच्छा दिल्या. चारही विभागातील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचा यथोचित गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरेल सुरवात संगीत शिक्षिका सौ. वर्षा खणकर यांच्या गुरूवंदनेने झाली. सूत्रसंचालन गीतांजली शेरकर, अतिथी परिचय सतीश मेढे यांनी केले. व समारोप पसायदानाने केला गेला.



पंचायतराज मंत्रालय भारत सरकारच्या वतीने शाश्वत विकास ध्येयाचे स्थानिकीकरण कार्यक्रमात पंचायत विकास निर्देशांक व राष्ट्रीय पंचायत पुरस्कार सन २०२२–२३ आधारित जिल्हास्तर जलसमृद्ध गाव प्रथम पुरस्कार हिवरेबाजारला प्रदान करण्यात आला याप्रसंगी पुरस्कार स्वीकारताना हिवरे बाजारचे सरपंच विमलताई ठाणगे आदी.

# आदर्शगाव हिवरे बाजारला 'जल समृद्ध गाव पुरस्कार' प्रदान

नगर – नुकताच पंचायतराज मंत्रालय भारत सरकारच्या वतीने शाश्वत विकास ध्येयाचे स्थानिकीकरण कार्यक्रमात पंचायत विकास निर्देशांक व राष्ट्रीय पंचायत पुरस्कार सन २०२२–२३ आधारित जिल्हास्तर जलसमृद्ध गाव प्रथम पुरस्कार हिवरेबाजारला मिळाला. राज्यशासनाच्या ग्रामविकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि ग्रामीण भागातील विकासाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या महत्वाकांक्षी उपक्रमाची अंमलबजावणी सुरू केली आहे.

याप्रसंगी विधानपरिषदेचे अध्यक्ष राम शिंदे, आदर्शगाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री डॉ. पोपटराव पवार, आमदार काशिनाथ दाते, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार विक्रम पाचपुते, यशदाचे उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जि.प. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक उपस्थित होते.

हिवरे बाजार गावाला पाण्याच्या ताळेबंदावर आधारित पिक पद्धतीचा अवलंब तसेच गुणवत्तापूर्ण जलसंधारण कामामुळे हा पुरस्कार मिळाला असून पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे होते. पुरस्कार स्वीकारताना हिवरे बाजारचे सरपंच विमलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन राम चत्तर, एस.टी.पादीर, मुंबादेवी दुध डेअरी चेअरमन बाबासाहेब गुंजाळ, सहदेव पवार, राजू सहादू ठाणगे, राजू पवार, श्रीपत फलके ग्रामविकास अधिकारी, गुलाब गायकवाड व ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ. विखे पाटील महाविद्यालयात १३ सप्टेंबरला माजी विद्यार्थी मेळावा

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनच्या अभियांत्रिकी महाविद्यालय, आयबीएमआरडी, फार्मसी व कृषी महाविद्यालयातर्फे माजी विद्यार्थी मेळावा १३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आहेत. तर प्रमुख पाहुणे फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील उपस्थित राहणार आहेत.

मेळाव्यात विशेष आमंत्रित माजी विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यामध्ये राहुल कर्डिले (जिल्हाधिकारी, नांदेड सीओई माजी विद्यार्थी २००७ बॅच), डॉ. प्रताप बडे (जनरल मॅनेजर, रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट, एन्झाईन बायोसायन्सेस लिमिटेड, पुणे सीओपी माजी विद्यार्थी २००२ बॅच), डॉ. संजीव चौहान (मुख्य कार्यकारी अधिकारी, एस्पार्दा फॅशन प्रा. लि.,चंदीगड/गुरगाव, हरियाणा आयबीएमआरडी माजी विद्यार्थी १९९५ बॅच) तसेच भारत इंगळे (उपसंचालक, कृषी विभाग, जळगाव सीओए माजी विद्यार्थी २०१९ बॅच) यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रातील उच्चपदस्थ ९०० माजी विद्यार्थ्यांचीही उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमाला फाऊंडेशनचे सचिव जनरल (कार्यकारी) डॉ. पी.एम. गायकवाड, संचालक (वैद्यकीय) डॉ.अभिजीत दिवटे, संचालक (तांत्रिक) प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रवींद्र नवथर (अभियांत्रिकी), संचालक डॉ. संजय धर्माधिकारी (आयबीएमआरडी), प्राचार्य डॉ. प्रताप पवार (फार्मसी), प्राचार्य डॉ.सोमेश्वर राऊत (कृषी) आयोजन व नियोजनासाठी मार्गदर्शन लाभत आहे. तसेच शिक्षक समन्वयक प्रा.डॉ. संदिप उदावंत, अभियांत्रिकी महाविद्यालय, डॉ. शुभांगी पोतदार, आयबीएमआरडी, डॉ.वाहिद आंबेकर, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय व प्रा.किशोर मोरे, कॉलेज ऑफ अ‍ॅग्रीकल्चर नियोजन करत आहेत.

# जिल्ह्यातील ५० सुतारकाम व्यावसायिकांचा गौरव

**एशियन पेंट डेजिव्ह व दिसान इंटरप्राईजेसचा उपक्रम**

नगर – जिल्हाभरातील ५० सुतारकाम करीत असलेल्या व्यावसायिकांचा सन्मान करून त्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. या व्यावसायिकांना विविध बक्षिसे देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली असल्याची माहिती दिसान इंटरप्राईजेसचे संचालक संजय कोकाटे यांनी दिली.



एशियन पेंट डेजिव्ह कंपनी व दिसान इंटरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाभरातील ५० सुतारकाम करीत असलेल्या व्यावसायिकांचा सन्मान करून त्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे.

एशियन पेंट डेजिव्ह कंपनी व दिसान इंटरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने कारपेंटरांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात कोकाटे बोलत होते. यावेळी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी सुग्रीम कुमार, प्रशांत शिंदे, सुनिल लांडगे, प्रमोद गोर्डे, अमर भोसले यांच्यासह जिल्हाभरातून आलेले कारपेंटर उपस्थित होते.

यावेळी सुग्रीम कुमार म्हणाले की, एशियन पेंट डेजिव्हतर्फे जिल्ह्यातील सुतारकाम करीत असलेल्या व्यावसायिकांसाठी कंपनीने एक योजना एरिया मॅनेजर अमरित शेखर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली होती. त्यानूसार कंपनीचे विविध साहित्य वापरुन विक्रीचे टप्पे गाठणाऱ्या व्यावसायिकांना बक्षिसे ठेवण्यात आली होती. त्यानूसार जिल्ह्यातील १०० जणांनी यामध्ये सहभाग घेतला. त्यातील ५० जण या योजनेसाठी पात्र ठरले. त्यानूसार ५० जणांना वॉशिंग मशीन, एलइडी टीव्ही, ओव्हन, ट्रॉली बॅग, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

व्यावसायिक प्रकाश सुतार म्हणाले की, मी गेल्या आठ ते दहा वर्षांपासून या व्यवसायात आहे. आमची ही दुसरी पिढी या व्यवसायात असून कंपनीचे साहित्य आमच्या प्रत्येक साईटवर वापरले जाते. हे साहित्य अत्यंत दर्जेदार असल्यामुळे त्याला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. या कंपनीचे जिल्ह्याचे डिस्ट्रीब्यूटर संजय कोकाटे यांचे आम्हाला नेहमी प्रोत्साहन मिळत असते. त्यामुळे आमची विक्री व व्यावसायाची कामगिरी चांगली असल्याचे ते म्हणाले.

# शिक्षक दरबारात शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना आमदार दराडेंनी घेतले फैलावर

**पैसे दिल्याशिवाय कामे होत नसल्याचा शिक्षकांचा आरोप; एजंटचे रेकॉर्डिंग सभागृहात वाजले**

नगर – जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी ११ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात शिक्षक दरबार भरवला. या दरबारात आमदार दराडेंनी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत अनेक मुद्यांवर फैलावर घेतले.



शिक्षक दरबारात शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना आमदार दराडेंनी जाब विचारत अनेक मुद्यांवर फैलावर घेतले.

दरबाराच्या सुरुवातीसच काही शिक्षकांनी थेट आरोप केला की, विविध मान्यतांसाठी पैसे दिल्याशिवाय मंजुरी दिली जात नाही. याच दरम्यान एका अपंग शिक्षकाच्या मान्यतेसाठी एजंटमार्फत मागण्यात आलेल्या पैशांच्या रेकॉर्डिंगची ध्वनिफीतही सभागृहात वाजवण्यात आली. त्यामुळे वातावरण चांगलेच तापले. यावर प्रतिक्रिया देताना आमदार दराडे यांनी स्पष्ट केले की, जर कोणत्याही कामासाठी आर्थिक व्यवहाराची मागणी होत असेल, तर संबंधित शिक्षकांनी अँटी करप्शन विभागाकडे व पोलिसांकडे तक्रार दाखल करावी. अशा प्रकारच्या अन्यायाला बळी पडू नये.

या शिक्षक दरबाराला प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते. तर माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनील पंडित, सचिव संभाजी पवार, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे प्रसाद शिंदे, सुनील दानवे, ज्ञानदेव बेरड, भाऊसाहेब रोहकले, मिथुन डोंगरे, तसेच जळगावचे शिक्षक नेते संभाजी पाटील आदींसह जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर उपस्थित होते.

शिक्षकांनी दरबारात अनुकंपा धारकांची मान्यता, शालार्थ आयडी, प्राचार्य मान्यता, निवड श्रेणी मान्यता, शाळा स्वमान्यता, आरटीई प्रलंबित मान्यता, संच मान्यता (सन २०२४–२५) वाटप, मुख्याध्यापक रजा रोखीकरण, फरक बिल प्रकरणे, वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांचे प्रमाणपत्र, अंशतः अनुदानित शाळांचा वाढीव टप्पा, तसेच रिक्त पदे भरणे यासारखे मुद्दे मांडले. त्याचबरोबर सन २०२२ पासून पीएफ स्लिप उपलब्ध करून द्याव्यात हीही मागणी झाली.

आमदार दराडे यांनी या सर्व प्रश्नांवर अधिकाऱ्यांना थेट विचारणा केली आणि हा दरबार म्हणजे शिक्षकांचे प्रश्न सोडविण्याचे व्यासपीठ आहे, अधिकाऱ्यांना त्रास देण्याचा हेतू नाही. योग्य समन्वयाअभावी काही प्रश्न प्रलंबित राहिले, आता सर्व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यावर तोडगा निघेल, असे स्पष्ट केले. शिक्षक दरबाराचे नियोजन वैभव सांगळे व आमदार दराडे यांचे स्वीय सहाय्यक हरीश मुंडे यांनी केले होते.

# 'केडगाव स्पोर्टस्' चे सहा खेळाडू अहिल्यानगर बास्केटबॉल संघात

**सब ज्युनिअर बास्केटबॉल स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार**

नगर – सोलापूर येथे होणाऱ्या सब ज्युनिअर बास्केटबॉल स्पर्धेसाठी केडगाव स्पोर्ट्स् अकॅडमीच्या सहा खेळाडूंची अहिल्यानगर सब ज्युनिअर संघात निवड झाली आहे. यामध्ये ध्रुव गुगळे, आदिराज कोतकर, कृष्णा ठुबे, यश सोले, आर्यन वाघचौरे, तनिष्का बारहाते यांचा समावेश आहे.



सोलापूर येथे होणाऱ्या सब ज्युनिअर बास्केटबॉल स्पर्धेसाठी अहिल्यानगर सब ज्युनिअर संघात निवड झालेले केडगाव स्पोर्ट्स् अकॅडमीचे खेळाडू.

१० ते १५ सप्टेंबर दरम्यान सोलापूर येथे महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशन सब ज्युनिअर स्पर्धेला प्रारंभ झाले असून, या स्पर्धेमध्ये सदर खेळाडू अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. खेळाडूंना प्रशिक्षक छबुराव कोतकर व स्वाती बारहाते यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल सरस्वती विद्यालय मुख्याध्यापक संदीप भोर, प्राध्यापक प्रसाद जमदाडे, डॉ. देवेश कुमार बारहाते, पत्रकार विक्रम लोखंडे, संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



वर्धमान प्लायवूडचे कर्मचारी गणेश रासकर यांचा वाढदिवस साजरा करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# प्रामाणिक व चांगल्या कर्मचाऱ्यांमुळे व्यवसायाचा उत्कर्ष होण्यासाठी मदत

**शैलेश मुनोत यांचे प्रतिपादन; वर्धमान प्लायवूडचे कर्मचारी गणेश रासकर यांचा ५० वा वाढदिवस साजरा**

नगर – कोणत्याही व्यवसायात चांगले व प्रामाणिक कर्मचारी असतीलच तर त्या व्यवसायाचा उत्कर्ष निश्चित होतो. ग्राहकांशी त्यांचा थेट संवाद असतो. ग्राहकाच्या मागणीनुसार योग्य उत्पादन ते तत्परतेने उपलब्ध करून देतात. त्यामुळे व्यावसायिकही नवनवीन संधी शोधत व्यवसाय वृद्धीसाठी निश्चित मनाने काम करू शकतो, असे प्रतिपादन नगरमधील वर्धमान प्लायवूडचे संचालक शैलेश मुनोत यांनी केले.

येथील कर्मचारी गणेश राजाराम रासकर यांचा ५० वा वाढदिवस नुकताच साजरा करण्यात आला. यावेळी मित्र परिवारातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी नगरसेवक सुरेश आंबेकर, रामदास कानडे, राज, रोनक मुनोत आदी उपस्थित होते.

भगवान फुलसौंदर म्हणाले, गणेश रासकर हे पूर्वी प्लंबिगचे काम करायचे. मागील पाच वर्षांपासून ते प्लायवूड येथे कार्यरत आहेत. प्रामाणिकपणा व निष्ठा ठेवून ते कर्तव्य बजावत असतात. त्यामुळेच आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवार एकत्र आलेला आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्याही ते समर्थपणे पार पाढत आहेत. त्यांना उदंड आनंदी आयुष्य लाभो हीच शुभेच्छा आहे.

गणेश रासकर म्हणाले माझा हा झालेला सत्कार मला व माझ्या परिवारासाठी आनंददायी असून मला ऊर्जा देणार आहे

# आर्या आंबेकर यांच्या गायनाने तर कृष्णा साळुंके यांच्या बहारदार पखवाज वादनाने अहिल्यानगरकर मंत्रमुग्ध

नगर – पुनीत बालन ग्रुप सादर तालचक्र युवा, पुणे व अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नंदनवन लॉन्स येथे झालेल्या सा रे ग म प फेम महाराष्ट्राची युवा पार्श्वगायिका आर्या आंबेकर यांच्या सुमधुर गायनाने व तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांचे शिष्य कृष्णा साळुंके यांच्या बहारदार पखवाज वादनाने अहिल्यानगरकर रसिक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाची सुरुवात कृष्णा साळुंके यांच्या पखवाज वादनाने झाली. त्यांनी ताल चौतालमध्ये विविध रचना तसेच छंद परण व स्तुती परण अतिशय तयारीने सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. त्यांच्या बरोबर त्यांचे शिष्य यश मेस्त्री आणि ज्ञानेश्वर अंडील यांनी पखवाज साथ केली तर अथर्व कुलकर्णी यांनी संवादिनी साथ, प्रफुल्ल सोनकांबळे यांनी गायन साथ व प्रभात राव यांनी मंजिरा साथ केली. त्यानंतर दुसऱ्या सत्राची सुरुवात आर्या आंबेकर यांच्या सुमधुर गायनाने झाली. त्यांनी सुरुवातीला गणेश वंदना, सौभाग्यदा लक्ष्मी यांबरोबरच कितीदा तुला नव्याने आठवावे, फुलवंती, बाई गं कस करमत नाही गं, हृदयात वाजे समथिंग, माझा होशील ना, सलोना सा सजन, लग जा गले फुलवंती या गाण्यांनी रसिक मनावर भुरळ घातली. कार्यक्रमाच्या शेवटी वंदे मातरम गाऊन सांगता केली. त्यांना अनय गाडगीळ, राहुल कुलकर्णी, ओंकार इंगवले, अभय इंगळे यांनी समर्पक साथसंगत केली. माणिक देव आणि जान्हवी देऊळगावकर यांनी सूत्रसंचालन केले.





पुनीत बालन ग्रुप सादर तालचक्र युवा, पुणे व अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात आर्या आंबेकर यांच्या सुमधुर गायनाने तर कृष्णा साळुंके यांच्या बहारदार पखवाज वादनाने अहिल्यानगरकर मंत्रमुग्ध झाले होते.

या कार्यक्रमास पद्मश्री पं. विजजी घाटे, नगरसेविका शीतल जगताप, संतोष पाठक, सत्यम कांकरिया, पियुष बोगावत, नागेश्वरी भोसेकर, राजीवजी नयन, प्रसन्न पाठक, ज्ञानेश शिंदे, धनेश बोगावत, विलास बडवे, आर्मी स्कूलच्या प्राचार्या नूतन मिश्रा, डॉ. नीरज करंदीकर आदी उपस्थित होते. यांच्या हस्ते आर्या आंबेकर यांचा पुण्श्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मृतीचिन्ह देऊन अनाहत एक कलासृष्टी तर्फे सन्मान करण्यात आला.

अनाहतचे प्रसाद सुवर्णपाठकी, ओंकार देऊळगावकर, आनंद कुलकर्णी, माणिक देव, संकेत सुवर्णपाठकी, महेश कुलकर्णी, सौ. श्रेया सुवर्णपाठकी, सौ. अनुजा कुलकर्णी, सौ.राधिका पाठक, अविनाश शिरापुरी, संदीप कुलकर्णी, चंद्रकांत पंडित, प्रा. प्रसाद बेडेकर यांच्या हस्ते कलाकारांचा सन्मान करण्यात आला. कृष्णा बेलेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंकित पवार, गीतांजली सगम, गायत्री धनलगडे, सौ. मोहिनी खोल्लम, शार्दूल व सर्वेश खोल्लम, देवेन कुलकर्णी, अनिकेत देऊळगावकर, राधिका सुवर्णपाठकी, सोहम सौंदणकर, सुपर्ण प्रताप, गणेश बैरागी, सौरभ साठे, तन्वी देशपांडे, अनिकेत गोसावी, साक्षी धोकटे, वैष्णवी फिसके, सौ. अनघा पछाडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास अहिल्यानगर शहराबरोबरच पाथर्डी, कडा, आष्टी, शेवगाव, सुपा तसेच पुणे येथील रसिक उपस्थित होते.

# प्रोत्साहनाचा सामाजिक महामंत्र
# राष्ट्रीय प्रोत्साहन दिनाचे समाजशास्त्रीय भान

*मानवी समाजाचा पाया हा आशा, परस्परावलंबन आणि सकारात्मक भावनांवर उभा असतो. या भावनांमधील सर्वात प्रभावी भावना म्हणजे प्रोत्साहन होय. प्रोत्साहन ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून ती सामाजिक ऊर्जेचा असा प्रवाह आहे जो व्यक्तीला आत्मविश्वास देतो, समूह किंवा गटांना ऐक्य देतो आणि समाजाला प्रगतीची दिशा देतो. म्हणूनच दरवर्षी १२ सप्टेंबर रोजी साजरा होणारा 'राष्ट्रीय प्रोत्साहन दिन' आपल्याला या अदृश्य परंतु अत्यंत प्रभावी शक्तीचे स्मरण करून देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले, तर प्रोत्साहन हा मानवी विकासाचा अविभाज्य घटक आहे.*

### कुटुंब आणि प्रोत्साहन

समाजशास्त्र सांगते की कुटुंब ही समाजाची प्राथमिक सामाजिक संस्था आहे. माणूस पहिल्यांदा जी मूल्ये शिकतो, ती याच कुटुंब या सामाजिक संस्थेतून शिकतो. प्रोत्साहन हे मूल्य कुटुंबातील रोजच्या संवादातून मुलांमध्ये बिंबते. आईवडिलांचे 'तू हे करू शकशील' हे एक वाक्य मुलामध्ये आत्मविश्वास निर्माण करते. भावंडांची साथ, आजी-आजोबांचे आशिर्वाद, ही सगळी प्रोत्साहनाची रूपे आहेत. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खीमने म्हटल्याप्रमाणे, व्यक्तीचे सामाजिकरण हे समाजाचे पुनरुत्पादन आहे. जर कुटुंबात सकारात्मकतेचे आणि प्रोत्साहनाचे वातावरण असेल, तर मुलामध्ये आशावादी दृष्टिकोन विकसित होतो. याउलट सततची टीका, तुलना आणि नकारात्मकता यामुळे मुलामध्ये आत्मविश्वासाची कमतरता निर्माण होते, आणि त्याचा परिणाम पुढील सामाजिक जीवनावर होतो.

### शिक्षणव्यवस्था आणि प्रोत्साहन

शिक्षण हे समाजातील सामाजिक गतिशीलतेचे मुख्य साधन आहे. परंतु शिक्षण फक्त माहितीपुरते मर्यादित नसून ते मुलांच्या मानसिक आणि भावनिक विकासालाही दिशा देते. शिक्षकाच्या प्रोत्साहनाने विद्यार्थ्यांची शिकण्याची आवड टिकून राहते. अनेक संशोधनांमध्ये दिसून आले आहे की ज्या विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून सकारात्मक दाद मिळते, त्यांची शैक्षणिक प्रगती अधिक वेगवान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शालेय जीवनात शिक्षकांनी दिलेले प्रोत्साहनच त्यांना उच्च शिक्षणाच्या मार्गावर नेणारे ठरले. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर प्रोत्साहन ही सामाजिक भांडवलाची गुंतवणूक आहे. कारण प्रत्येक प्रोत्साहित विद्यार्थी समाजासाठी उपयोगी संसाधन ठरतो.

### कार्यक्षेत्र आणि प्रोत्साहन

समाजशास्त्रात 'मानवी संसाधन' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. कामाच्या ठिकाणी व्यक्ती फक्त पगारासाठी काम करत नाही, तर त्याला स्वतःची किंमत मान्य व्हावी, ही अपेक्षा असते. वरिष्ठांचे प्रोत्साहन, सहकाऱ्यांचा आधार आणि संस्थेची मान्यता हे घटक कर्मचारी समाधानीपणा आणि उत्पादनक्षमतेला चालना देतात. कामगारांच्या उत्पादनक्षमतेत वाढ ही फक्त तांत्रिक सुधारांमुळे होत नाही, तर त्यांना मिळणाऱ्या सामाजिक मान्यतेमुळे आणि प्रोत्साहनामुळेही होते. त्यामुळे प्रोत्साहन हे केवळ व्यक्तीच्या कारकिर्दीला नव्हे, तर संस्थेच्या विकासालाही दिशा देते.

### वंचित समाजगट आणि प्रोत्साहन

इतिहास साक्ष देतो की समाजातील दुर्बल गटांना जेव्हा प्रोत्साहन मिळाले, तेव्हा त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना दिलेले शिक्षणाचे प्रोत्साहन, राजर्षी शाहू महाराजांनी मागासवर्गीयांना दिलेला सामाजिक आधार, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वंचितांना शिक्षण घेण्याचे आवाहन या सर्व उदाहरणांनी प्रोत्साहनाची परिवर्तनकारी ताकद अधोरेखित केली आहे. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे झाले तर प्रोत्साहन हे सामाजिक गतिशीलतेचे उत्प्रेरक आहे. प्रोत्साहनामुळे दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती समूह किंवा गट यांसारख्या समाजघटकांनी शिक्षण, नोकरी आणि राजकारणात स्थान मिळवले आहे.

### प्रोत्साहन आणि मानसिक आरोग्य

आजच्या तणावग्रस्त युगात मानसिक आरोग्य हा मोठा सामाजिक प्रश्न बनला आहे. नैराश्य, चिंता, आत्महत्येची प्रवृत्ती या समस्या प्रामुख्याने तरुणांमध्ये दिसतात. मानसशास्त्र सांगते की एखाद्या व्यक्तीला जेव्हा त्याच्या प्रयत्नांना मान्यता मिळते, तेव्हा त्याचा आत्मसन्मान वाढतो आणि मानसिक आरोग्य सुधारते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे महत्त्वाचे आहे कारण निरोगी व्यक्तीच निरोगी समाजाची निर्मिती करू शकते. म्हणूनच प्रोत्साहन ही मानसिक आरोग्याची सामाजिक लस आहे.

### सामाजिक चळवळींमध्ये प्रोत्साहन

प्रत्येक सामाजिक चळवळीचा पाया प्रोत्साहनात दडलेला असतो. लोकमान्य टिळक यांचे 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हे विधान म्हणजे जनतेला दिलेले विराट प्रोत्साहन होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूँगा' हे आवाहन जनतेला नव्या संघर्षासाठी तयार करणारे ठरले. महात्मा गांधींचे अहिंसेचे तत्त्वज्ञान हे केवळ विचार नव्हते, तर जनतेला दिलेले नैतिक प्रोत्साहन होते. या सर्व उदाहरणांतून स्पष्ट होते की प्रोत्साहन हे मोठ्या सामाजिक बदलांचे प्रेरणास्थान असते.

### डिजिटल युगातील प्रोत्साहन

आजच्या तंत्रज्ञानप्रधान समाजात प्रोत्साहनाचे स्वरूपही बदलले आहे. सोशल मीडियावरील सकारात्मक प्रतिसाद एखाद्या कलाकाराला उभारी देतो. ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षकांचे प्रोत्साहन त्यांचा आत्मविश्वास वाढवते. परंतु डिजिटल युगातील नकारात्मक टीका, ट्रोलिंग किंवा उपेक्षा अनेकांना मानसिकदृष्ट्या खचवते. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टीने डिजिटल प्रोत्साहन ही नवी संकल्पना महत्त्वाची ठरते. जबाबदारीने दिलेले प्रोत्साहन समाजाला सकारात्मक दिशा देऊ शकते.

### जागतिक संदर्भातील प्रोत्साहन

समाजशास्त्राचा अभ्यास सांगतो की प्रोत्साहन ही फक्त वैयक्तिक किंवा राष्ट्रीय गोष्ट नसून ती आंतरराष्ट्रीय पातळीवरही महत्त्वाची आहे. विकसित देशांमध्ये 'सक्षमीकरण' या संकल्पनेत प्रोत्साहनाचा आधार आहे. आफ्रिकेतील स्त्रियांना दिलेले प्रोत्साहन, अमेरिकेतील नागरी हक्क चळवळींमध्ये मिळालेला आधार किंवा संयुक्त राष्ट्रसंघाने राबवलेल्या शैक्षणिक मोहिमांमध्ये दिलेले प्रोत्साहन या सर्व उदाहरणांमधून दिसते की प्रोत्साहन हा जागतिक विकासाचा महामार्ग आहे.

शेवटी, समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले, तर प्रोत्साहन ही एक सामाजिक प्रक्रिया आहे जी व्यक्तीला बळकट करते, गटांना ऐक्य देते आणि समाजाला प्रगतिशील बनवते. दरवर्षी १२ सप्टेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय प्रोत्साहन दिन हा केवळ प्रतीकात्मक दिवस नाही, तर प्रत्येकाला स्मरण करून देणारा दिवस आहे की आपण आपल्या आजूबाजूच्या लोकांना योग्य वेळी प्रोत्साहन देऊन त्यांच्या जीवनात आशेचा दिवा पेटवू शकतो. जर आपण कुटुंबात मुलांना, शाळेत विद्यार्थ्यांना, कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांना, समाजात वंचितांना आणि डिजिटल जगात एकमेकांना प्रामाणिक प्रोत्साहन दिले, तर समाजात सकारात्मकता, समता आणि बंधुता वाढेल. प्रोत्साहन ही केवळ वैयक्तिक कृती नाही, तर सामाजिक परिवर्तनाची ऊर्जा आहे.



म्हणूनच राष्ट्रीय प्रोत्साहन दिन हा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रोत्साहनाच्या अपरिमित शक्तीचा सन्मान करणारा उत्सव आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत मुला-मुलींच्या गटातून प्रवरा पब्लिक, आर्मी स्कूल, आठरे पाटील, आयकॉन व ज्ञानसंपदा स्कूलची आघाडी



नगर - फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत ११ सप्टेंबरला झालेल्या सामन्यात १७ वर्षा आतील मुलींमध्ये आठरे पाटील व कर्नल परब स्कूलने विजय मिळवला. तर १२ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल, प्रवरा पब्लिक स्कूल व आठरे पाटील स्कूलने विजय संपादन केले. तर १४ वर्ष वयोगटात (मुले) सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट, प्रवरा पब्लिक स्कूल व द आयकॉन स्कूलचा संघ विजेता ठरला. या स्पर्धेत गुणांची कमाई करुन विविध मुला-मुलींच्या गटातून प्रवरा पब्लिक स्कूल, आर्मी स्कूल, आठरे पाटील स्कूल, आयकॉन स्कूल व ज्ञानसंपदा स्कूलने आघाडी घेतली आहे.

सकाळच्या सत्रात १७ वर्षा आतील मुलींमध्ये आठरे पाटील स्कूल विरुध्द आर्मी पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात आठरे पाटील संघाला वेदिका ससे व निलम पवार यांनी प्रत्येकी १ गोल करुन २-० गोलने विजय मिळवून दिला.

कर्नल परब विरुध्द डॉन बॉस्को यांच्यात झालेल्या सामन्यात २-० गोलने कर्नल परबने विजय मिळवला. यामध्ये माही बहुरुपी व हिरन्या गरुड यांनी प्रत्येकी १ गोल केला.

१२ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द कर्नल परब स्कूल मध्ये झालेल्या सामन्यात संकल्प जाधव याने २ गोल करुन आर्मी पब्लिक स्कूलला २-० ने विजय मिळवून दिला.

दुपारच्या सत्रात १४ वर्ष वयोगटात (मुले) सेक्रेट हार्टकॉन्व्हेंट स्कूल विरुध्द डॉन बॉस्को यांच्यात झालेल्या सामन्यात सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूलने १-० गोलने विजय मिळवला. यामध्ये हर्षद सोनावणे याने १ गोल केले.

प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात प्रवरा पब्लिक स्कूलच्या संघाने आक्रमक खेळ करुन तब्बल ९ गोल केले. तर प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही. ९-० गोलने प्रवरा पब्लिक स्कूलच्या संघाने एकहाती विजय मिळवला. यामध्ये मोहित चौधरी व रामचंद्र पालवे याने २, अभिनव राऊत याने ४ व धीरज चारस्कर याने १ गोल केला.

१२ वर्ष वयोगटात (मुले) प्रवरा पब्लिक स्कूल विरुध्द ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात प्रवरा पब्लिक स्कूलने ५-०गोलने विजय संपादन केले. जयवर्धन मानेदेशमुख व संग्राम चौधरी यांनी प्रत्येकी १ गोल केला. युवराज आहेर याने २ व राजवर्धन दारकुंडे याने ओन गोल केला.

आठरे पाटील पब्लिक स्कूल विरुध्द तक्षीला स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात आठरे पाटील स्कूलने ४-० गोलने विजय मिळवला. सात्विक कर्पे व विश्वजीत आकाडे याने प्रत्येकी १ गोल केला. वेदांत ससे यांनी २ गोल केले.

१४ वर्ष वयोगटात (मुले) कैसर एज्युकेशन स्कूल विरुध्द द आयकॉन स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात द आयकॉन स्कूलने ३-० गोलने विजय मिळवला. यामध्ये मयंक बजाज, इशान गरड व श्रेयश बांगर यांनी प्रत्येकी १ गोल केला.

गुणांवर आघाडी घेतलेले संघ पुढीलप्रमाणे - १७ वर्षे मुली अ गट श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल ७ गुण, प्रवरा पब्लिक स्कूल ५ गुण., १७ वर्षे मुली ब गट आठरे पाटील पब्लिक स्कूल १२ गुण, पोदार इंटरनॅशनल स्कूल ६ गुण., १६ वर्षे मुले अ गट प्रवरा पब्लिक स्कूल ४ गुण, श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल २ गुण., १६ वर्षे मुले ब गट आठरे पाटील पब्लिक स्कूल ४ गुण, तक्षिला स्कूल २ गुण., १६ वर्षे मुले क गट ज्ञानसंपदा स्कूल ३ गुण, आर्मी पब्लिक स्कूल ३ गुण., १६ वर्षे मुले ड गट सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट ४ गुण, द आयकॉन पब्लिक स्कूल ४ गुण., १४ वर्षे मुले अ गट प्रवरा पब्लिक स्कूल ६ गुण, श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल ६ गुण., १४ वर्षे मुले ब गट आठरे पाटील पब्लिक स्कूल ६ गुण, ऑर्चिड्स इंटरनॅशनल स्कूल ६ गुण., १४ वर्षे मुले क गट आर्मी पब्लिक स्कूल ९ गुण, अशोकभाऊ फिरोदिया स्कूल ३ गुण., १४ वर्षे मुले ड गट सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट ६ गुण, द आयकॉन पब्लिक स्कूल ६ गुण., १२ वर्षे मुले अ गट प्रवरा पब्लिक स्कूल १२ गुण, ऑक्सिलीयम कॉन्व्हेंट ६ गुण., १२ वर्षे मुले ब गट आठरे पाटील पब्लिक स्कूल १२ गुण, आर्मी पब्लिक स्कूल ६ गुण



राज्यस्तरीय प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांचा 'स्नेहबंध' चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी अहिल्यानगर किल्ल्याची प्रतिकृती देऊन सन्मान केला.

# पैगंबर जयंतीनिमित्त १५ सप्टेंबरला मोफत आरोग्य तपासणी शिबिर



नगर - शहरातील कोठला स्टॅण्ड जवळील इंगळे मेडिकल शेजारी येथे असलेल्या पटेल स्पेशालिटी क्लिनिकतर्फे पैगंबर जयंतीनिमित्त १५ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० ते दुपारी २ या वेळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यात रक्तातील थायरॉईड, तीन महिन्यांची रक्तातील साखर (Hb1c), चरबी (Lipid profile) आणि शुगर तपासणी नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. अशपाक पटेल यांनी दिली.

शिबिराचे मार्गदर्शन फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट व हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अशफाक पटेल (M.B.B.S., M.D. Medicine) करणार आहेत. डॉ. पटेल यांनी एम.बी.बी.एस. (के. ई.एम. मुंबई), एम.डी. मेडिसिन (एस.के.एन. पुणे) यासह युनायटेड किंगडम, नवी दिल्ली व न्यूयॉर्क येथून डायबेटीस, हृदयरोग, जेरियाट्रिक मेडिसिन आणि इतर विषयात उच्च शिक्षण घेतले आहे. त्यांना गुंतागुंतीच्या हृदयविकार तसेच डायबिटीस व्यवस्थापनाचा दांडगा अनुभव आहे.

माहितीसाठी पटेल स्पेशालिटी क्लिनिक ९२७२५५५७५८ / ९६२३३१६११२ या क्रमांकावर संपर्क करावे, असे आवाहन आयोजकांनी यांनी केले आहे.

# आंतरमहाविद्यालय कबड्डी स्पर्धेत स्व.लक्ष्मणराव जाधव चषकाचा 'श्रीरामपूरचा अशोकनगर संघ' ठरला प्रथम क्रमांकाचा मानकरी



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने आंतरमहाविद्यालय कबड्डी स्पर्धेत स्व.लक्ष्मणराव जाधव चषकाचा प्रथम क्रमांकाचा मानकरी श्रीरामपुरच्या अशोकनगरचा संघ ठरला.

नगर - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत महात्मा फुले नूतन कॉलेज, मिरजगाव यांच्या वतीने आंतरमहाविद्यालय कबड्डी (मुले) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील तब्बल ३९ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवून उत्कृष्ट क्रीडा भाव व लढाऊ जिद्दीचे दर्शन घडविले. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. सुनील जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी जाधव, सचिव राजेंद्र देवकाते, विजय म्हस्के, प्रा. सुभाष देशमुख, डॉ. विनायक काळे, शरद मगर, प्रा. विकास साळवे, पंच विजय जठार आबा विधाते, व सचिन कांबळे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेची अंतिम सामना अहिल्यानगर येथील वाडीयापार्क क्रीडा संकुल येथे पार पडली. रोमांचक अंतिम सामन्यात एसीएस कॉलेज, अशोक नगर (श्रीरामपूर) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय क्रमांक त्रिमूर्ती कॉलेज, नेवासा फाटा यांनी मिळविला. तृतीय क्रमांक बोरावके कॉलेज, श्रीरामपूर यांना प्राप्त झाला तर चौथा क्रमांक एम. जे. एस. कॉलेज, श्रीगोंदा यांना मिळाला.

यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. सुनील जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कबड्डी हा खेळ आपल्याला शिस्त, एकजूट आणि संकटसमयी निर्णय घेण्याची ताकद शिकवतो. आजच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही नावलौकिक मिळविणे गरजेचे आहे. विद्यापीठस्तरीय स्पर्धेत जिल्ह्याचा संघ उत्तम प्रदर्शन करेल, याबाबत मला खात्री आहे. गेल्या बारा वर्षांपासून मी आमचे वडिल स्व. लक्ष्मणराव मारुतीराव जाधव यांच्या स्मरणार्थ या स्पर्धेतील विजेत्या संघांना फिरता चषक व रोख पारितोषिक देत आहे. या माध्यमातून तरुणाईला प्रोत्साहन मिळावे, हा हेतू आहे. कबड्डीचा खेळ ग्रामीण व शहरी भागातून घडतो, त्यामुळे या स्पर्धेतून जिल्ह्यातील खर्या अर्थाने गावागावातील क्रीडापटू घडत आहेत. या खेळाडूंचा आत्मविश्वास व जिद्द पाहून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडतील, असा विश्वास आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय म्हस्के यांनी केले.

# 'चले जाव' (क्विट इंडिया मुव्हमेंट) यानिमित्ताने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांचा अहमदनगर महाविद्यालयात गौरव

## वक्तृत्व स्पर्धा ही विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुण व व्यक्तिमत्व विकासासाठी महत्त्वाचे व्यासपीठ : प्राचार्य डॉ. नोएल पारगे



अहमदनगर महाविद्यालय गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'चले जाव' (क्विट इंडिया मूव्हमेंट) यानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

नगर - अहमदनगर महाविद्यालय गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'चले जाव' (क्विट इंडिया मूव्हमेंट) यानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामधील यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आला.


यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्राचार्य प्रा. दिलीप भालसिंग, विनाअनुदानित विभाग मुख्य समन्वयक प्रा. डॉ. रज्ज़ाक सय्यद, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुधीर वाडेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. सिद्धी नागपुरे (सांख्यिकी विभाग), द्वितीय क्रमांक कु. इकरा फातिमा, तृतीय क्रमांक कु. अक्षदा ढसाळ यांनी मिळवला तर उत्तेजनार्थ केशव गौड याची निवड करण्यात आली.

प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी सांगितले की, वक्तृत्व स्पर्धा ही विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण विकास करण्यास एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. अहमदनगर महाविद्यालयातील गांधी अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने हे व्यासपीठ उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना मिळेल.

उपप्राचार्य प्रा. दिलीप भालसिंग यांनी वक्तृत्व हे एक नैसर्गिक कौशल्य असून महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी हे कौशल्य आत्मसात करू शकतो. आत्मविश्वास हा सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा असून सकारात्मक आत्मविश्वास वक्तृत्व स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतो, असे मत व्यक्त केले.

विनाअनुदानित विभागाचे मुख्य समन्वयक प्रा. डॉ. रज्ज़ाक सय्यद यांनी आपल्या भाषणात गांधी अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र विभागाचा वक्तृत्व स्पर्धा उपक्रम कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कला व कौशल्याला वाव मिळत असून ही संधी युवकांनी मोठ्या प्रमाणात घ्यावी. व्यक्तिमत्व विकासाच्या जडणघडणीत वक्तृत्व स्पर्धा महत्त्वाची आहे, असे मत मांडले.

या कार्यक्रमाला राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुधीर वाडेकर, प्रा. आकांक्षा नवले, प्रा. भास्कर कसोटे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. विलास नाबदे यांनी आभार मानले.



नालेगाव येथील नाना पाटील वस्ताद तालीमच्या वतीने विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेल्या मल्लांचा सत्कार माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात कुस्ती क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल पुरस्कारप्राप्त अनिल म्हस्के तसेच विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेले शौर्य मदने, तेजस डागवाले, योगीराज वामन, चिदंबर शिंदे, आर्य दातरंगे, रुद्र शिंदे तसेच कुराश स्पर्धेतील विजेता मल्हार सुरसे यांचा सन्मान करण्यात आला.

# महानगरपालिका शालेय जलतरण स्पर्धेत आठरे पाटील स्कूलमधील विद्यार्थ्यांचे यश

नगर - सावेडी येथील कराळे जलतरण येथे २९ ऑगस्ट रोजी झालेल्या महानगरपालिका शालेय जलतरण स्पर्धेत आठरे पाटील पब्लिक स्कूलमधील निवासी इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. १४ वर्षे वयोगटात चि. पाटील विरेन निंबा याने १०० मीटर फ्रि स्टाईल स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला.

१७ वर्षे वयोगटात चि. डोंगरे श्रवण याने ५० मीटर बॅक स्ट्रोक स्पर्धेत व्दितीय क्रमांक पटकावला. तसेच १०० मीटर फ्रि स्टाईल स्पर्धेत व ५० मी फ्रि स्टाईल स्पर्धेत चि. गिते नंदन ज्ञानदेव याने व्दितीय क्रमांक पटकावला आहे.

या सर्व विजयी खेळाडूंचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील, सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक, समन्वयक, प्राथमिक विभाग प्रमुख, पर्यवेक्षिका, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी अभिनंदन केले.

या खेळाडूंना शाळेचे जलतरण प्रशिक्षक पठाण फिरोज यांचे मार्गदर्शन लाभले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## नव्या टायरला छोटे काटे का असतात ?

आपण नेहमीच काही गोष्टी पाहत असतो; पण त्या तशाच का आहेत, याचा फारसा विचार करीत नाही. तुम्ही पाहिलं असेल की, तुम्ही जेव्हा एखादं नवं वाहन खरेदी करता तेव्हा त्याच्या टायरला छोटे-छोटे स्पाईकसारखे स्ट्रक्चर असतं. त्याचा आकार छोट्या काट्यासारखा दिसतो. आता प्रश्न असा निर्माण होतो की, हे काटे या टायरला का असतात व त्याचं नेमकं काम काय आहे? अनेकांना याचं खर कारण माहीत नसणार. आज आपण याबाबत माहिती जाणून घेणार आहोत.



आपल्या सर्वांना एक गोष्ट ठावूक आहे की, सुरक्षेच्या दृष्टिकोणातून खराब झालेले आणि जास्त घासलेले वाहनांचे टायर बदलले जातात. तुम्ही सर्वांनी पाहिलं असेल की, तुम्ही जेव्हा एखादी गाडी खरेदी करता तेव्हा त्या वाहनाच्या चाकांना छोटे-छोटे स्पाईक्स असतात. हे स्पाईक्स कडक नसतात, मऊ असतात; मात्र ते वाहनांच्या चाकामध्ये एखादा काटा फसावा असे उभे दिसतात. चाकांना लावण्यात आलेल्या या स्पाईकला अनेक नावं आहेत. काही ठिकाणी याला निब असं म्हणतात, तर काही लोक याला निपर्स किंवा स्पाईक असं म्हणतात. टायर निर्माण होत असतानाच हे स्पाईक्स त्याच्यासोबतच तयार होतात. म्हणजे या काट्यांना किंवा स्पाईकला वाहनांच्या टायरला वेगळं लावण्यात येत नाही, किंवा त्याची वेगळी निर्मितीदेखील होत नाही. टायर बनवताना सर्वात प्रथम द्रव रूपात असलेल्या रबराला साच्यामध्ये टाकलं जातं. द्रव रूपातील रबर हे संपूर्ण साच्यामध्ये पसरावं यासाठी हवेच्या दबावाचा उपयोग केला जातो. हवेच्या दबावामुळे रबर आणि साच्यामध्ये हवेचे बुडबुडे निर्माण होतात; मात्र टायर बनत असताना हे जर हवेचे बुडबुडे तसेच राहिले, तर त्याचा परिणाम हा चाकाच्या क्वॉलिटीवर होण्याची शक्यता असते. त्यामुळे हे बुडबुडे काढून टाकण्यासाठी एक विशिष्ट पद्धत वापरली जाते. टायरच्या छोट्या-छोट्या छिद्रांमधून हवा बाहेर काढली जाते. या प्रक्रियेदरम्यान रबराचा काही भाग टायरच्या वर येतो, हा भाग सुकल्यानंतर त्याचा आकार काट्यासारखा दिसतो. याचाच अर्थ हे स्पाईक्स मुद्दाम तयार केले जात नाहीत. एखाद्या चाकाला स्पाईक्स आहेत, याचा अर्थ ते टायर नवं आहे, असा त्याचा अर्थ होतो, इतकेच!



## सर्वात मोठी चपाती!

संपूर्ण जगात अशा अनेक आश्चर्यकारक गोष्टी आहेत ज्यांच्याविषयी आपल्याला काहीच माहीत नाही. त्यापैकी एक अशी गोष्ट आहे ती म्हणजे एक चपाती आहे ती इतकी मोठी असते की त्यामध्ये आपल्या आठ चपात्या होतील! तिचा आकार हा सामान्य चपातीच्या तुलनेत आठपट जास्त असतो. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही चपाती युनेस्कोनं त्यांच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट केली आहे.

चपाती ही संपूर्ण जगात खाल्ली जाते. प्रत्येक देशात चपातीचा एक वेगळा प्रकार बनवण्यात येतो, पण तुम्हाला माहीत आहे का की आर्मेनियामध्ये एक असा चपातीचा किंवा रोटीचा प्रकार आहे ज्याचा आकार भलताच मोठा असतो. ही चपाती सर्वसाधारण चपातीच्या तुलनेत आठ ते दहापट जास्त मोठी असते. आर्मेनियाच्या या लोकप्रिय असलेल्या चपातीला किंवा रोटीला लावश असं म्हणतात. ही चपाती जगातील सगळ्यात मोठ्या चपात्यांपैकी एक आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ही चपाती तंदूरमध्ये बनवण्यात येते. ही चपाती सगळ्यात आधी आर्मेनियामध्ये बनवण्यात आली. ती अजरबैजान, इराण आणि तुर्कीमध्ये देखील लोकप्रिय आहे. त्याचे सांस्कृतिक महत्त्व पाहाता त्याचं जागतिक वारसा यादीत देखील सहभागी करण्यात आले आहे. या चपातीचा संबंध केवळ उदरभरणासाठी नाही तर त्यासोबत अनेक सांस्कृतिक परंपरांशी त्याचा संबंध आहे.

चीन, जपानमध्ये चहापानाला जसे एक धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असते तसाच हा प्रकार आहे. ही चपाती बनवल्यानंतर तिची घडी घालून व डबाबंद करून बराच काळ ठेवण्यात येतं. लवाश, पीठ, पाणी, यीस्ट, साखर आणि मीठ मिक्स करून ही चपाती बनवण्यात येते. अनेक ठिकाणी ही चपाती यीस्ट आणि साखरेशिवाय देखील बनवतात. तर ही चपाती चविष्ट बनवण्यासाठी तंदूरमध्ये टाकण्याआधी त्यावर तीळ आणि खसखस वरून टाकण्यात येतं. या चपातीला दोन्ही बाजूने पसरवून तंदूरमध्ये शिजवण्यात येतं. तर ही नरम रहावी यासाठी त्याला फोल्ड करून पॅक करण्यात येतं. तुम्ही वर्षभर ही चपाती खाऊ शकता. काही काळानंतर तुम्ही याला पापडसारखे खाऊ शकता आणि तेव्हाही ही चपाती तितकीच चविष्ट लागत

## रोबोंचा नृत्यविक्रम!


गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्मध्ये अनेक भन्नाट विक्रमांची नोंद असते. त्यामध्ये रोबोंच्या नृत्याचीही नोंद पाहायला मिळते. इटलीत तब्बल १३७२ रोबोंनी एकत्रितपणे हे नृत्य केले होते व त्याची नोंद रेकॉर्ड बुकमध्ये झाली होती. इटलीतील या विक्रमाने चीनमध्ये झालेला यापूर्वीचा विक्रम मोडला होता. २०१६ पासून टेक कंपन्या नर्तक रोबोंची निर्मिती करीत असून एकाचवेळी जास्तीत जास्त रोबोंनी नृत्य करण्याचे नवे नवे विक्रमही घडत आहेत.

इटलीत २०१८ मध्ये हा अनोखा विक्रम झाला होता. त्यापूर्वी चीनमध्ये २०१७ मध्ये १०६९ डोबी यंत्रमानवांनी एकत्रित नृत्य केले होते. हे सर्व रोबो ह्युमनॉईड म्हणजेच मानवी आकाराचे रोबो आहेत. इटलीत 'अल्फा १ एस' रोबोंनी सामूहिक नृत्य केले. हे रोबो ४० सेंटीमीटर उंचीचे होते व ॲल्युमिनियमच्या संमिश्रापासून बनवलेल्या प्लास्टिक आवरणाने ते आच्छादित होते. विशेष म्हणजे चीनी रोबोंचा विक्रम इटलीत मोडणारे हे रोबोही चीनमध्येच बनलेले होते. चीनच्या उबटेक या कंपनीने हे रोबो बनवले. याच रोबोंनी चीनमध्ये २०१६ मध्ये प्रथमतः नृत्य केले होते. 'अल्फा १ एस' रोबो हे लवचिक असून ते नृत्यातील वेगवेगळ्या लयी संगीतानुसार बदलू शकतात. हे सर्व ह्युमनॉईड रोबो सारख्या वेळेत न चुकता नृत्य करीत आहेत, याची खात्री करून त्यांच्या विक्रमांची नोंद करण्यात आली होती.



## सर्वात दूरवरचा तारा

अंतराळाच्या अनंत पसाऱ्यात अनेक ग्रह-तारे आहेत. 'नासा'च्या अंतराळात सोडलेल्या अनेक दुर्बिणी अशा दूरस्थ ग्रह-ताऱ्यांचा शोध घेत असतात. आतापर्यंतचा सर्वात लांबचा ताराही 'नासा'च्या अशा स्पेस टेलिस्कोपने शोधलेला आहे. विश्वाच्या मध्यावर निळ्या रंगात असणाऱ्या या विशाल ताऱ्याचे नाव 'इकारस' असे ठेवलेले आहे. हा तारा इतका दूर आहे की, या ताऱ्याचा सूर्यप्रकाश पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी नऊ अब्ज वर्षे लागतील! जगातील सर्वात मोठ्या, शक्तिशाली दुर्बिणीनेही हा तारा धूसर दिसू शकतो. गुरुत्वाकर्षण लेन्सिंग नावाच्या प्रक्रियेमुळे धुसर तारा चमकू शकतो. यामुळे खगोलशास्त्रज्ञ दूरवरील ताऱ्यांनाही पाहू शकतात. बर्कले युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियामधील संशोधकांनी हा तारा शोधला आहे. या संशोधनाचे नेतृत्व पेट्रिक केली यांनी केले. आकाराने मोठा आणि विशिष्ट लक्षणे असलेला एकमेव तारा हे त्याचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. हा तारा ज्याठिकाणी आहे, त्याच्या आसपास अनेक आकाशगंगा आहेत; मात्र त्यामधील ताऱ्यांपासून किमान शंभरपट दूर अंतरावर एकाकी आहे. अत्यंत दूरवर असलेल्या या ताऱ्याच्या शोधामुळे ब्रह्मांडाच्या निर्मितीच्या काळातील अनेक रहस्ये उलगडण्यास मदत होऊ शकते.





## माणूस आयुष्यभरात किती अन्न खातो ?

अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. 'उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' असे आपण म्हणत असलो, तरी हल्ली अनेक माणसं जेवणावर आडवा हात मारून आडवे होण्याच्याच विचारात असतात. अर्थात अन्न आपल्या जीवनाचा एक अतिमहत्त्वाचा भाग आहे. आपण जे काही करतो ते अन्न मिळवण्यासाठीच करतो. आपण दिवसभरात काही ना काही खात असतो; मात्र एखादा माणूस आयुष्यभरात किती किलो अन्न फस्त करतो, हे तुम्हाला माहिती आहे का?

विस्कॉन्सिन स्टेट जर्नलमधील एका लेखानुसार, आपण आपल्या आयुष्यातील सुमारे २.५ वर्षे स्वयंपाक करण्यामध्ये आणि ३.६ वर्षे खाण्यात घालवतो. याचाच अर्थ आपण दररोज सुमारे ६७ मिनिटे अन्न खात असतो. विचार करा की एक व्यक्ती त्याच्या आयुष्यात किती अन्न खात असेल! अहवालानुसार, एक व्यक्ती त्याच्या आयुष्यात सुमारे ३५ टन (३५००० किलो) अन्न खातो; पण या ३५ टनांमध्ये आपण काय काय खाल्ले ते देखील महत्त्वाचे असते. कारण, आपण जे खातो ते आपल्या आरोग्यासाठी चांगले आहे का? हे देखील तपासून पाहावे. बरेच लोकांना आरोग्यासाठी पोषक अन्न खाण्याची आवड असते; परंतु ते हवे तितके सोपे नाही. कारण, अनेकांना मग फास्टफूड, मिठाई आणि सोडा असलेले अन्न खाण्यापासून स्वत:ला रोखावे लागेल; पण हे नेहमीच शक्य होईल का, हा प्रश्न आहे, तरीही केवळ चवीसाठी नव्हे, तर आरोग्य व दीर्घायुष्यासाठीही पोषक अन्नावर भर देणे गरजेचे आहे.

## कासव गडद रंगांना घाबरतं ?



कोणत्याही प्राण्याला जर कोणत्या गोष्टीपासून धोका असेल, तर लगेचच ते प्रतिकार करण्याच्या मोडमध्ये येतात. असंच कासवाचंदेखील आहे; पण कासव गडद रंगांच्या गोष्टींना का घाबरते जाणून घ्या. कासवांपासून काळ्या किंवा इतर गडद रंगाच्या वस्तू दूर ठेवल्या पाहिजेत.

तलाव, नदी किंवा कोणत्याही जलाशयाच्या आजूबाजूला तुम्ही कासवे पाहिली असतील; पण तुम्हाला माहीत आहे की, कासवांचे काळ्या रंगाबद्दल एक वेगळेच वर्तन असते. ज्यामुळे ते आक्रमक होऊ शकतात. सोशल मीडियावर तुम्ही पाहिले असेल की, कासवाला समोर काळ्या रंगाच्या वस्तू दिसल्या की ते लगेच त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करते. काळे शूज असो किंवा इतर कोणत्याही काळ्या वस्तू दिसल्या की कासव आक्रमक होते. संशोधनात असे समोर आले आहे की, कासवांना काळ्या रंगाचा तिरस्कार नसतो. काळा रंग ते त्यांच्या भक्षकांशी जोडतात. काळा रंग हा त्यांच्यासाठी संभाव्य धोका दर्शवितो. ज्यामुळे ते सावध होतात. जेव्हा-जेव्हा त्यांना काळ्या रंगाचे काही दिसते, ते त्याच्याकडे शिकारी असल्यासारखे पाहतात. आपल्या शैलीने ते त्याला मारण्याचा प्रयत्न करतात. हा त्यांच्या नैसर्गिक संरक्षण यंत्रणेचा भाग असतो. कासवांना केवळ काळाच नाही, तर इतर रंगदेखील ओळखता येतात. लाल, हिरवा, निळा, केशरी, पिवळा असे रंग ते ओळखण्याची क्षमता ठेवतात. काही कासव जे समुद्रात असतात किंवा स्लाइडर कासवं जे हिरव्या आणि निळ्या रंगांकडे अधिक आकर्षित होतात, कारण ते त्यांच्या सागरी वातावरणाच्या जवळ असतात; परंतु गडद रंगाचा, विशेषत: काळा ते बऱ्याचदा विरोध करतात. जंगलात गडद रंग हे धोकादायक शिकारींचे प्रतीक मानले जातात. कासव त्यांच्या नैसर्गिक वातावरणात अशा रंगांना भक्षकांशी जोडतात. उदाहरणार्थ, कावळे आणि साप यांसारखे शिकारीही गडद रंगाचे असतात. या कारणास्तव, कासव काळा रंग पाहून सावध होतात आणि आक्रमक प्रतिक्रिया देतात.

*मत्स्याहार आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त मानला जातो; पण मासे खाल्ल्यामुळे वजन घटवण्याचा विचार तुम्ही कधी केलाय का? आहारतज्ज्ञांच्या मते तुम्हाला मासे खायला आवडत असतील, तर ग्रिल किंवा बेक करून मासे खाल्ले असता त्याचा शरीराला खूप उपयोग होऊ शकतो; मात्र अतिरिक्त प्रमाणात मासे खाणेही योग्य नाही. एका महिलेने मात्र तीन महिने फक्त मासे खाल्ले आणि १५ किलो वजन कमी केले, असा दावा केला आहे. हे पाहता तिचे डॉक्टरही थक्क झाले आहेत.*

## वेटलॉससाठी तीन महिने फक्त मत्स्याहार

न्यूयॉर्क पोस्टने दिलेल्या वृत्तानुसार ही महिला फ्लोरिडाची रहिवासी आहे. जेन क्रुमेट असे तिचे नाव आहे. ती ६२ वर्षांची आहे. नुकतीच ती सेवानिवृत्त झाली. काही महिन्यांपूर्वी तिचे वजन १०९ किलो होते. ती एवढी वैतागली होती की, तिला चालता-फिरताही येत नव्हते. ती एका डॉक्टरांना भेटली. त्यांनी तिच्या खाण्या-पिण्यावर अनेक निर्बंध घातले. त्याचा तिला काहीच उपयोग झाला नाही.

जेन म्हणाली, माझे पाय खूप दुखत असत. पायांवर सूजही आली होती. खूप भूक लागायची. त्यामुळे मी काहीही खात असे. मी वैतागले होते आणि वजनापुढे हात टेकले होते. त्याचवेळी मला डॉ. एनेट बोसवर्थ भेटली. ती डॉ. बोज म्हणून ओळखली जाते. तिने वजन कमी करण्यासाठी सांगितलेला उपाय आश्चर्यजनक होता.. तिने मला फिश फास्टची आयडिया दिली. साहजिकच प्रश्न पडला, फिश फास्ट म्हणजे काय?

याचा अर्थ की, मी तीन महिने फक्त आहारात मासेच खायची. सार्डिन मासा खावा, असे तिने मला सुचवले. त्यामुळे वजन लवकर कमी होईल, असेही ती म्हणाली. मला आधी हे जरा विचित्र वाटले; पण तिने त्याचे फायदे सांगितल्यामुळे मी फिश फास्ट करून बघायचे ठरवले, असेही जेनने स्पष्ट केले. सार्डिन मासा खाल्ल्यामुळे अन्नाचे पचन लवकर होते. बॉडी फॅटचे ज्वलन लवकर होते आणि त्याचे ऊर्जेत रूपांतर होते. डॉ. बोजचा सल्ला ऐकून जेनने रोज सार्डिन मासा खायला सुरुवात केली. हा एक तेलकट मासा आहे. तरीही जेन रोज चार डबे सार्डिन मासे खात असे. त्यामुळे तिला सुमारे १५०० कॅलरी मिळत. सार्डिन मासे खायला सुरुवात केल्यानंतर दोन आठवड्यांतच तिला फरक जाणवण्यास सुरुवात झाली. तिचे सहा किलो वजन कमी झाले. तीन महिन्यांत तिने चक्क १५ किलो वजन घटवले.



सार्डिन हा अत्यंत गुणकारी मासा आहे. अमेरिकेत आजारी व्यक्तींना तो खाण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जातो. त्यात ओमेगा थ्री फॅटी ॲसिडस्, प्रोटीन, व्हिटॅमीन डी आणि कॅल्शियम असते. कॅलरीज कमी असतात.

## सोसायटीने पाडला कृत्रिम पाऊस!



दिल्लीतील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत आहे. दिल्लीतील प्रदूषण दिवसेंदिवस चिंतेचा विषय बनत चालला आहे. गुरुग्राममधील हवा गुणवत्ता निर्देशांक अत्यंत खराब श्रेणीमध्ये आहे. यामुळे शहरातील एका गृहनिर्माण संकुलाने वायू प्रदूषणाचा सामना करण्यासाठी एक अनोखी पद्धत निवडली आहे. गुरुग्राम सेक्टर ८२ मधील डीएलएफ प्राईमस सोसायटीने धूळ आणि कणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अग्निशमन कार्यात मदत वापरण्यास येणारी स्प्रिंकलर आणि पाण्याच्या पाईप्सचा वापर करून 'कृत्रिम पाऊस' पाडला आहे. ३२ मजली उंच असलेल्या टॉवर्समधून कॉम्प्लेक्सवर पाणी पाडलं जात असल्याचा व्हिडीओ समोर आला आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना कॉम्प्लेक्सचे अध्यक्ष अचल यादव यांनी म्हटलं की, रहिवाशांचे आरोग्यासाठी हे उपाय केले गेले आहेत. प्रदूषण केवळ सरकारद्वारे नियंत्रित केले जाऊ शकत नाही. सर्वांनीच हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी आवश्यक असल्यास दररोज इथे कृत्रिम पाऊस पाडला जाणार आहे. केवळ सरकारवर अवलंबून न राहता गुरुग्रामच्या प्रत्येक रहिवाशाने यात योगदान दिले पाहिजे. आम्ही आमच्या ३२ मजली इमारतींवरून कृत्रिम पाऊस पाडत आहोत. जेणेकरून किमान धूळ आणि इतर कण, जे लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचे नुकसान पोहोचवू शकतात, यातून दिलासा मिळेल, असं यादव यांनी म्हटलं. प्रदूषण कमी करण्यासाठी क्लाऊड सीडिंगचा प्रयत्न केला जाऊ शकतो. यामध्ये पर्जन्य वाढवण्यासाठी सिल्व्हर आयोडाइड आणि कोरड्या बर्फासारखे पदार्थ वातावरणात पसरवून केले जातात. दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी या आठवड्यात सांगितले की, 'आप' सरकार वायू प्रदूषणाशी लढण्यासाठी कृत्रिम पावसाचा वापर करण्याचाही विचार करत आहे.

# साहित्य व कलेकडे तरुणांना वळवण्याच्या उद्देशाने युवा साहित्य व नाट्य संमेलनाचे आयोजन

**मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांचे प्रतिपादन; सारस्वतांच्या संमेलनाचे उद्घाटन**



राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्यसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी.

नगर – आत्ताच्या युवा पिढीने अस्तित्वासाठी संघर्ष करत सर्व स्थित्यंतर पाहिली आहेत. भारताच्या लोकसंख्येतील सर्वाधिक भार तरुणाईचा आहे. या तरुणाईच्या ताकदीवरच भारत महासत्ता होणार आहे. त्यामुळे त्यांच्या भावनांचा विस्फोट होणार नाही याची काळजी घेऊन त्यांच्या भविष्याचा विचार होणे आवश्यक आहे. साहित्य व कला हे सामर्थ्य निर्माण करत जातीपातीचे भिंती दूर करत माणसं जोडत आहेत. या साहित्य व कलेकडे तरुणांना वळवणे हा उद्देश या युवा साहित्य व नाट्यसंमेलना मागचा आहे. जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रात गेलात तरी पुस्तकांनी दिलेले पंख उपयोगी येतील. तुम्हाला संघर्ष अटळ आहे पण संघर्षाच्या व अस्तित्वाच्या नादात जगणं हरवू नका. आभासी जगात जगू नका, तंत्रज्ञानाच्या जगात माणूसपण हरवू नका, पुस्तकाला आपला सर्वात प्रिय मित्र मानून जवळ करा, असा सल्ला अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी उपस्थित युवकांना देऊन म्हणाले, युवा साहित्य संमेलनास मोठ्या प्रमाणात जमलेले युवा श्रोते पाहून मोठे समाधान वाटत आहे. युवकांच्या उपस्थितीने हे संमेलनचे वातवरण जोशपूर्ण व उत्साही झाले आहे. या संमेलनाची नोंद मराठी साहित्य परिषद नक्कीच घेणार आहे. जयंत येलूलकर यांनी उत्कृष्ट नियोजनबद्धपणे या संमेलनाचे यशस्वी आयोजन करून हा मराठीचा समृद्ध वारसा जपला आहे, असे सांगितले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सावेडी उपनगर शाखा व न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालय संयुक्त विद्यमाने होत असलेल्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्यसंमेलनाचे उद्घाटन मिलिंद जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा अभिनेत्री गौरी देशपांडे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.प्रशांत भालेराव, आमदार संग्राम जगताप, साहित्य मंडळाच्या प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, राज्य ग्रंथालयाचे संचालक अशोक गाडेकर, जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, सिताराम खिलारी, जयंत वाघ, हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले, माजी उपमहापौर गणेश भोसले, संमेलनाचे निमंत्रक जयंत येलुलकर, जेष्ठ कवी चंद्रकांत पालवे, डॉ. सुधा कांकरिया व न्यू आर्ट्स कॉमर्स चे प्राचार्य बाळासाहेब सागडे आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक, साहित्यिक, कवी व युवक उपस्थित होते.

गौरी देशपांडे म्हणाल्या, युवकांचे साहित्य संमेलन अहिल्यानगरमध्ये होणे हे खरोखर औचित्यपूर्ण आहे. युवा ही समाजामध्ये विधायक बदल घडवून आणणारी शक्ती आहे. ही शक्ती वास्तव्या पासून दूर जात जीवघेण्या स्पर्धेत स्वत:ला हरवून बसली आहे. त्यामुळे आयुष्यात हरलो असे मानून नैरयाश्यात जात आहे. बंद पाडलेल विचार चक्र पुन्हा सुरु करण्याचे बळ साहित्य, नाट्य व कलेत आहे. म्हणून या जीवघेण्या स्पर्धेत एखादा छंद व कला जोपासा. आपल्या माय मराठीला जागवण्याचे व फुलवण्याचे काम तरुण पिढीकडे आहे. मराठी शाळा, मराठी साहित्य, मराठी नाटक यांना जपण्यासाठी आपण जाणीवपूर्वक काम केले पाहिजे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, येणारी नवी पिढी घडण्यासाठी असे साहित्य संमेलन होणे आवश्यक आहे. नगरच्या भूमीने साहित्य व कलाक्षेत्रात अनेक दिग्गज व्यक्तिमत्व दिले आहेत. सोशल मीडियाच्या महाकाय वृक्षाने पृथ्वीला वेढा घातला आहे. यापासून मुक्त होण्यासाठी साहित्य व कला जोपासणे हा एकमेव चांगला पर्याय आहे. अहिल्यानगर मध्ये जयंत येलुलकरांसारखे अनेक दर्दी व्यक्तिमत्व आहेत. त्यामुळे पुढील साहित्य संमेलन नगरला द्यावे ते नक्कीच यशस्वी करण्यासाठी सर्व चळवळीतील कार्यकर्ते प्रयत्न करतील.

स्वागत अध्यक्ष डॉ.प्रशांत भालेराव म्हणाले, आजचे युग तरुण पिढीचे आहे. मात्र पूर्ण जगामध्ये ही पिढी गोंधळलेली व मानसिक स्थिती खराब झालेली आहे. त्यामुळे अविवेकी वृत्तीने ही पिढी वागू लागली आहे. त्यामुळे तरुण पिढीने वाचण्यासाठी जास्तीत जास्त साहित्याला व कलेला जवळ करून आत्मसात करावे. तरच तुमचे प्रश्न सुटतील. साहित्य संमेलना सारखे उपक्रम हे तरुणांना वेगळे वळण व दिशा देणारे व्यासपीठ ठरेल.

सुनिता पवार म्हणाल्या, अहिल्यानगर मध्ये झालेले युवा साहित्य व नाट्य संमेलचे उत्कृष्ट नियोजित केले आहे की हे मिनी अखिल भारतीय साहित्य संमेलनच वाटत आहे. आगामी १०१ वे साहित्य संमेलन नगर मध्ये होण्याची केलेली मागणी विचरार्ह आहे.

यावेळी विश्वासराव आठरे यांनी जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचा १०५ वर्षाचा वैभवशाली इतिहास थोडक्यात व्यक्त केला.

प्रास्ताविकात जयंत येलुलकर यांनी साहित्य संमेलना आयोजनाच्या मागची भूमिका विशद करून येणारे १०१ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन नगरला द्यावे अशी मागणी केली. महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी नाट्य व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांना विशेष पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य बाळासाहेब सागडे यांनी आभार मानले. पसायदानाने उद्घाटन सोहळ्याची सांगता झाली.

# अहिल्यानगर शहरात २० सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय पोस्टर प्रस्तुतीकरण स्पर्धा

## फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे कौशल्य राज्यस्तरीय व्यासपीठावर

नगर – अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर यांच्यावतीने राष्ट्रीय फार्मसी सप्ताहाचे औचित्य साधून २० सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय पोस्टर प्रस्तुतीकरण स्पर्धा आहे. स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी होणार असून ते आपल्या कल्पकतेतून साकारलेली पोस्टर्स मांडून शैक्षणिक, संशोधनात्मक व सामाजिक विषयांवर प्रकाश टाकणार आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना, ज्ञान सादरीकरण कौशल्य वृद्धिंगत करणे आणि फार्मसी शिक्षणाचे शैक्षणिक स्तर उंचावणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू असेल. स्पर्धेत विद्यार्थ्यांना गुणवत्ता सादर करण्याची संधी मिळणार असून, त्यांच्या उत्साहवर्धनासाठी आकर्षक बक्षिसांची तरतूदही करण्यात आली आहे.

प्रथम क्रमांक – रु. ५०००, द्वितीय क्रमांक – रु. ३०००, तृतीय क्रमांक – रु. २००० या स्पर्धेला परीक्षक म्हणून नामांकित तज्ज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजन अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांच्या दूरदर्शी व प्रेरणादायी नेतृत्वाखाली, महाविद्यालयातील शिक्षकवृंदांच्या सहकार्याने करण्यात येणार आहे. तसेच, नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन, पुणे यांचे सहकार्य लाभणार आहे.

# एमआयडीसी परिसरातून मोपेडची चोरी; गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसी परिसरात असलेल्या सनफार्मा कंपनीच्या गेट समोर लावलेली हिरो कंपनीची प्लेझर मोपेड (क्र. एमएच १६ एएस२१६१) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १० सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत किशोर दत्तात्रय व्यापारी (वय ६८, रा. नवनाथनगर, गुलमोहर रोड, सावेडी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# सामना चित्रपटाचा धांडोळा घेत रामदास फुटाणे यांनी उलगडला प्रवास पट

**राज्यस्तरीय युवा साहित्य संमेलनात मनमोकळ्या गप्पा**


राज्यस्तरीय युवा साहित्य संमेलनात ज्येष्ठ कवी, वात्रटिकाकार व चित्रपट निर्माते रामदास फुटाणे यांची पत्रकार भूषण देशमुख यांनी 'सामना चित्रपटाची पन्नास वर्षांची वाटचाल' तसेच 'भारत कधी कधी माझा देश आहे' या विषयांवर दिलखुलास मुलाखत घेतली.

नगर – ज्येष्ठ कवी, वात्रटिकाकार व चित्रपट निर्माते रामदास फुटाणे यांनी नगर येथे झालेल्या राज्यस्तरीय युवा साहित्य संमेलनात आपल्या खास शैलीत रसिकांना मंत्रमुग्ध केले. 'सामना' या गाजलेल्या मराठी चित्रपटाचा धांडोळा घेत त्यांनी त्या चित्रपटामागचा प्रवास उलगडून सांगताना श्रोत्यांना थक्क केले. त्यांच्या विशेष कथनशैलीतून त्या काळातील प्रसंग, अनुभव आणि चित्रपट निर्मितीची अनोखी सफर रसिकांनी अनुभवली. यावेळी नगरचे पत्रकार भूषण देशमुख यांनी 'सामना चित्रपटाची पन्नास वर्षांची वाटचाल' तसेच 'भारत कधी कधी माझा देश आहे' या विषयांवर फुटाणे यांची दिलखुलास मुलाखत घेतली. मुलाखतीदरम्यान सामना चित्रपटातील काही सीन तसेच कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे... हे गाजलेले गाणे प्रदर्शित करण्यात आले. त्यामुळे उपस्थित श्रोते पुन्हा एकदा त्या चित्रपटाच्या सुवर्णकाळात रमून गेले

या मुलाखतीत रामदास फुटाणे यांनी आपल्या आयुष्याशी निगडित अनेक आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, आचार्य आत्रे यांच्या कडून मी जगण्याची प्रेरणा घेतली, दादा कोंडकेंनी मला वाट दाखवली, तर भालजी पेंढारकर यांनी संयम शिकवला. त्यामुळेच मी चित्रपट निर्मिती करू शकलो. अनेक चित्रपटांची निर्मिती केली पण अभिनयात रुची नसल्याने भूमिका केली नाही. मात्र नागराज मंजुळे यांच्या 'झुंड'मध्ये अमिताभ बच्चन यांच्याबरोबर छोटासा रोल केला.

सामनाला विरोध व बर्लिनपर्यंतचा प्रवास : फुटाणे यांनी सांगितले की सामना हा चित्रपट सहकारी चळवळी विरोधात असल्याने सुरुवातीला काहीसा विरोध झाला, पण नंतर तो लोकप्रिय ठरला. या चित्रपटाची निवड बर्लिन येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी झाली. तेव्हा निळू फुले आणि डॉ. श्रीराम लागू यांच्यासोबत बर्लिनला जाण्यासाठी काय काय दिव्य करावे लागले याचे किस्सेही रंगून सांगत त्यांनी सामना, सर्व साक्षी, सुगंध या चित्रपटांमागचा घटनाक्रमही श्रोत्यांसमोर मांडला.

वात्रटिकाकारचा शिक्का कवितेमुळे : ते पुढे म्हणाले, पानाफुलांच्या, प्रेमाच्या, चंद्रसूर्याच्या कविता करण्याऐवजी आपल्या आजूबाजूला जे जळतंय, घडतंय त्यावर भाष्य करणाऱ्या कविता मी लिहिल्या. त्यामुळे मला वात्रटिकाकारचा शिक्का बसला आणि प्रसिद्धी मिळाली. चित्रपटांपेक्षा कवितांनी मला अधिक काही दिले, असे सांगून त्यांनी 'भारत माझा कधी कधी देश असतो' या कार्यक्रमाची निर्मिती करून अनेक दिग्गज कवींना एकत्र आणले होते. हा कार्यक्रम राज्यात प्रचंड गाजल्याची आठवणही त्यांनी सांगितली.

आरक्षण व राजकारणावरील भाष्य : मी निर्मित केलेला सरपंच भगीरथ हा चित्रपट आरक्षणविरोधी असल्याने फ्लॉप झाला, पण त्यावेळी मी जे मांडले तेच आज घडत आहे. जातीय द्वेष वाढण्याला आरक्षणच कारणीभूत ठरत आहे. पूर्वी जातीय व्यवस्था होती पण जातीयता नव्हती. हा वाद मिटवण्यासाठी भूतकाळाच्या कटू आठवणी विसराव्या लागतील, असे ते म्हणाले.

राजकारणावर बोलताना फुटाणे म्हणाले, सध्या सर्व पक्षांची सत्ता हीच भूक आहे. स्वच्छ राजकारणासाठी काँग्रेसमध्ये पुन्हा यशवंतराव चव्हाणांनी आणि भाजपात पुन्हा अटलबिहारी वाजपेयी यांनी जन्म घ्यावा.

यावेळी साहित्य मंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी व संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव यांच्या हस्ते रामदास फुटणे व भूषण देशमुख यांचा गौरव करण्यात आला. यावेळी निमंत्रक प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार व संमेलनाच्या अध्यक्षा गौरी देशपांडे, निमंत्रक जयंत येलुलकर, प्रा. गणेश भगत, प्रा.मच्छिंद्र मालुंजकर, सदानंद भणगे, सुदर्शन कुलकर्णी आदींसह साहित्यिक उपस्थित होते.


विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात आर्टीर्फिशियल इंटीलिजन्स विषयावर सेमिनार प्रसंगी मार्गदर्शन करताना अनिकेत कर्डिले. समवेत विद्यार्थी (छाया – विजय मते)

# ए.आय.क्षेत्रात रोजगाराच्या असीम संधी

**अनिकेत कर्डिले यांचे प्रतिपादन; आर्टिफिशियल इंटिलिजन्स विषयावर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात सेमिनार**

नगर – विद्यार्थ्यांना स्वतःची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध कौशल्यविकास अभ्यासक्रमांचा अवलंब करा. ए. आय. चा वापर करून स्वतःचा व्यवसाय कसा उभारता येईल, स्टार्टअप्ससाठी कोणत्या सुविधा व संधी उपलब्ध आहेत याविषयी बिझनेस ॲनालिस्ट अनिकेत कर्डिले यांनी माहिती दिली. आजच्या बदलत्या काळात नुसते नोकरीसाठी प्रयत्न करण्यापेक्षा नवनवीन कल्पनांवर काम करून स्वावलंबनाच्या दिशेने पावले टाकणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आर्टिफिशियल इंटिलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स विभागात आर्टिफिशियल इंटिलिजन्स या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले. याचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर यांनी केले. यावेळी ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा.सुदर्शन दिवटे उपस्थित होते. या कार्यक्रमाला विविध विभागातील सुमारे २२५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

या सेमिनारसाठी अनिकेत कर्डिले यांनी विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटिलिजन्स क्षेत्रातील नोकरीच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. नवनवीन रोजगाराच्या संधी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, तसेच LinkedIn सारख्या डिजिटल नेटवर्किंग प्लॅटफॉर्मचा विद्यार्थ्यांनी करावयाचा उपयोग यावर त्यांनी विशेष भर दिला. ए.आय. मुळे रोजगार जाण्याची भीती ही चुकीची समजूत असून, उलट या क्षेत्रात भविष्यात रोजगाराच्या नवीन दालने खुली होतील हे त्यांनी स्पष्ट केले.

या सेमिनारचे आयोजन यशस्वी करण्यासाठी विभागप्रमुख प्रा. विद्या जगताप यांनी पुढाकार घेतला. प्रा.अंजली फलटणे, प्रा.जे. ई. घायतडक यांचे सहकार्य लाभले.

यावेळी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनील कल्हापुरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, ए. आय. व डेटा सायन्स हे तंत्रज्ञान केवळ रोजगारापुरते मर्यादित नाही तर सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठीही उपयुक्त ठरू शकते. विद्यार्थी संशोधन व नवनवीन कल्पना मांडून समाजातील बदलत्या गरजांना न्याय देऊ शकतात, असे सांगितले.

उपक्रमासाठी डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डायरेक्टर जनरल डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक व्यक्त केले.

# शिक्षकदिनानिमित्त 'सीताराम सारडा' च्या माजी विद्यार्थ्यांनी केला शिक्षकांचा सत्कार


सीताराम सारडा विद्यालय येथील १९८१ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देऊन शिक्षकदिना निमित्त सर्व शिक्षकांचा पुष्प व भेटवस्तू देऊन सत्कार केला.

नगर – सीताराम सारडा विद्यालय येथील १९८१ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देऊन शिक्षकदिना निमित्त सर्व शिक्षकांचा पुष्प व भेटवस्तू देऊन सत्कार केला

याप्रसंगी शाळेचे चेअरमन अजित बोरा, माजी मुख्याध्यापक मुदगल, मुख्याध्यापिका सौ. कानिटकर व सर्व शिक्षक, शिक्षेकतर कर्मचारी व सेवक वर्ग उपस्थित होता.

या निमित्ताने माजी विद्यार्थी प्रमोद बुऱ्हाडे यांनी शाळेसाठी ११,००० रुपयांचा धनादेश मंडळाकडे सुपूर्द केला.

यावेळी प्रमोद बुऱ्हाडे, सतीश कानिटकर, मुरलीधर काळे, राजेंद्र दळवी, उबेद शेख, अनिरुद्ध दळवी, राजेंद्र राऊत, संजय पवार, आबा सैंदाने, शिरीष बिडवाई, अनिल आरकल, मदन कांबळे, सौ उषा सोनटक्के आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयातील विविध उपक्रमांविषयी रामकृष्ण कुलकर्णी यांनी माजी विद्यार्थ्यांना अवगत केले. त्याबाबत सर्वांनी समाधान व्यक्त केले व भविष्यात शाळेला मदत करण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमात उबेद शेख, राजेंद्र दळवी, संजय पवार, सतिश कानिटकर, प्रमोद बुऱ्हाडे या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ.नंदा कानिटकर, सूत्रसंचालन दीपक आरडे व आभार प्रदर्शन दीपक शिरसाठ यांनी केले.

# बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या आयएमएसमध्ये एमबीए व एमसीए फ्रेशर्ससाठी ओरिएंटेशन कार्यक्रम





अहमदनगर बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च (आय.एम.एस.) येथे गेल्या पस्तीस वर्षापासून व्यावसायिक अभ्यासक्रम राबवले जातात तसेच संस्थेला राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक.) पुनर्मुल्यांकन मिळाले आहे. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील एम.बी.ए व एम.सी.ए फ्रेशर्ससाठी नुकताच ओरिएंटेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा असून, आठवडाभर चालणाऱ्या या सत्रांमुळे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेची पायाभूत सुविधा, संस्कृती, मुख्य विभाग तसेच सहाय्यक प्रणाली यांची ओळख होते. आय.एम.एस.मध्ये झालेल्या या कार्यक्रमात ग्रंथालय व प्रशासकीय विभागातील कर्मचारी यांना विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन व प्रशासकीय कार्यासंदर्भात मार्गदर्शन केले.

ग्रंथालयाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्हिडिओ क्लिप दाखवण्यात आली. यात लायब्ररी प्रोफाइल, विविध विभाग, वाचन कक्ष, सदस्यता नियम व क्लिअरन्स याबाबत माहिती होती. यावेळी ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस, जितिन आढाव, सिराज मुलानी व सुश्री कृष्णकुमारी थोरे यांनी स्वतःची ओळख करून दिली आणि त्यांच्या कामाचे स्वरूप सांगितले ग्रंथालयातील विविध विभागांची माहिती दिली.

या कार्यक्रमात संस्थेच्या पुरस्कारप्राप्त लायब्ररीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. लायब्ररी संसाधनांचा वापर, सेवा व संशोधन कौशल्यवृद्धी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ग्रंथालयातील सेवा, एन.ई.पी. २०२० अंतर्गत घेतले जाणारे उपक्रम तसेच एन.डी.एल.आय., डेलनेट, एन–लिस्ट, एनपीटेल व्हिडिओ स्ट्रिमिंग लायब्ररी, कॅलिबर डिजिटल लायब्ररी लायब्ररी टेलिग्राम नोटिफिकेशन सेवा व गूगल ड्राइव्हसारख्या संस्थात्मक संचयन सेवांची माहिती विद्यार्थ्यांनी उत्साहाने घेतली. ओरिएंटेशनचा हेतू विद्यार्थ्यांमध्ये लायब्ररीबद्दल आकर्षण निर्माण करून वाचन संस्कार वाढवणे हा होता. यामुळे विद्यार्थ्यांना भौतिक व डिजिटल लायब्ररीविषयी सखोल ज्ञान मिळाले. ग्रंथालयाबरोबरच कार्यालयीन कामकाजाचे महत्त्व अधोरेखित करताना आय.एम.एस.च्या ऑफिस सुप्रींटेंडंट सौ. शरयू कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या ह्या शैक्षणिक प्रवासात शिक्षणा इतक्याच अनेक महत्वाच्या बाबीची पूर्तता विद्यार्थीनी करावी ह्यासाठी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना प्रवेशच्या मान्यतेंसाठी लागणाऱ्या कागदपत्राचे महत्व सांगून, त्यांना तें योग्य वेळेत संस्थे कडे जमा करण्याचे सांगण्यात आले तसेच त्यांच्या या शैक्षणिक प्रवासात परीक्षेचा अर्ज वेळेत भरणे, परीक्षा प्रवेशपत्र वेळेत घेणे यासारख्या महत्वाच्या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी हा अभिमुखतेचा (orientation) उद्देश होता. तसेच शिष्यवृत्ती सारख्या महत्वाच्या विषयावर विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. शासनाच्या नवीन धोरणानुसार शैक्षणिक वर्षे २०२४–२५ पासून मुलींना शैक्षणिक शुल्कात १००% सूट देण्यात आली आहे आणि त्यासाठी महाडीबीटी वेबसाईट वर फॉर्म भरून सर्व कागदपत्राची पूर्तता करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या. महाडीबीटी या वेबसाईट वर नोंदणी करून अर्ज करणे व विविध कागदपत्रे अपलोड करणे या बाबत मार्गदर्शन या वेळी करण्यात आले. स्टुडन्ट सेक्शनचे विभाग प्रमुख महेश दिक्षीत व सी. डी. मोहिते, शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणारे दीपक तुंगार, बाळासाहेब कोतकर व राजू लोणकर; लेखापाल नरेंद्र कदम, लेखा सहाय्यक सौ. शुभांगी येळीकर व सौ. अनुश्री गुंफेकर व सुनील राशिनकर त्यांनी स्वतःची ओळख करून दिली आणि त्यांच्या कामाचे स्वरूप सांगितले. संबंधित विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्यांना आपल्या कामकाजा ची माहिती देऊन अडचणीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन केले. आयटी विभागातील किरण साबळे यांनी तांत्रिक बाबींमध्ये सहकार्य करून त्यांची जबाबदारी सांभाळली.

कार्यक्रमास संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. प्रणोती तेलोरे, आय.टी विभाग प्रमुख डॉ. महेश पोतदार आदी उपस्थित होते.

– **डॉ. एम. बी. मेहता,** संचालक, आय.एम.एस. अहमदनगर

